रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक ३४८ ▌पृष्ठे ८ ▌RGD/016/2026-28 www.krushival.in


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २६ मे २०२६

किंमत ४ ₹


## बीड शहर पुन्हा एकदा हादरले

**बीड:** बीड शहर पुन्हा एकदा धक्कादायक हत्याकांडाने हादरले आहे. बालेपीर परिसरात अवैध दारू दुकानात काम करणाऱ्या एका तरुणाची अमानुषपणे हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. उमेश दळवी असे मृत तरुणाचे नाव असून, त्याच्यावर करण्यात आलेली मारहाण ही मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणासारखीच असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. उमेश दळवी यांचे मारहाणीतील गंभीर अवस्थेतील फोटो सध्या सोशल माध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

## पेट्रोल-डिझेलच्या दरात पुन्हा वाढ

**मुंबई:** कच्च्या तेलाच्या दरात वाढ होत असल्याने भारतातील इंधन तेलाच्या दरात वाढ केली जात आहे. गेल्या १० दिवसांत भारतात चौथ्यांदा पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ झाली आहे. पेट्रोलियम कंपन्यांनी चार वर्षानंतर दि.१५ मे रोजी इंधन तेलाच्या दरात वाढ केली. त्यानंतर आतापर्यंत चार वेळा दर वाढवण्यात आले आहेत. पेट्रोल डिझेलच्या दरात सोमवारी (दि.२५) पुन्हा एकदा वाढ करण्यात आल्याने पेट्रोलचे दर २ रुपये ६१ पैशांनी तर डिझेलचे दर २ रुपये ७१ पैशांनी वधारले आहेत. त्यामुळे डिझेल ९७.८३ रुपये, तर पेट्रोल १११.१८ रूपये प्रती लीटर झाले आहे.

# आंबेनळी घाटात मृत्यूचे तांडव

**शैलेश पालकर**
। पोलादपूर ।

- स्कॉर्पिओ १००० फुट दरीत कोसळली
- सातारा जिल्ह्यातील ८ तरूण ठार
- १७ तासानंतर अपघाताचा सुगावा
- २७ तासांनी रेस्क्यूला सुरूवात

पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. रविवारी (दि.२४) पहाटेच्या सुमारास दाभिळटोक या ठिकाणी सुमारे १००० फुट खोल दरीत स्कॉर्पिओ गाडी कोसळून भीषण अपघात घडल्याचे उघडकीस आले. याबाबत रविवारी रात्री माहितीमिळाल्याने रेस्कू करणे धोकादायक असल्याने सोमवारी (दि.२४) सकाळी ८.०० वाजण्याच्या सुमारास रेस्क्यूची सुरूवात करण्यात आली. या अपघातात सातारा जिल्ह्यातील ८ तरूण ठार झाल्याची अधिकृत माहिती पोलादपूरचे सहाय्यक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांनी दिली.

पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटातील दाभिळटोक हे अनेकदा मृत्यूचे टकमकटोक ठरले आहे. आजपर्यंत या ठिकाणी अनेक भीषण अपघात झाले आहेत. पहिल्यांदा दाभिळटोक येथे झीटिव्हीचे संचालक झैदी यांची कार कोसळून संपूर्ण झैदी कुटूंब ठार झाले होते. त्यानंतर याच ठिकाणी डॉ.बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठाची बस कोसळली होती. या अपघातात एक व्यक्ती वगळता बसमधील संपूर्ण ३० प्रवासी कर्मचारी ठार झाले होते. आणि आता त्याच ठिकाणी स्कॉर्पिओ गाडी कोसळून आठ जण ठार झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सातारा जिल्ह्यातील ८ तरूण दापोलीतील करदे समुद्रकिनाऱ्यावर गेले होते. ते रविवारी पहाटे मौजमजा करून परतत असताना त्यातील एकाही तरुणासोबत मोबाईलद्वारे संपर्क होत नसल्याने याबाबत नातेवाईकांनी सातारा पोलीसांकडे संपर्क साधला. त्यावेळी त्यांचे शेवटचे लोकेशन आंबेनळी घाटातील दाभिळटोक येथे आढळून आले. त्यानंतर रात्री १०.०० वाजण्याच्या सुमारास याठिकाणी दरीच्या दिशेचे •> पान २ वर




### आसगाव, मरडे आणि आझादपूर दुःखात

आंबेनळी घाटात कोसळलेल्या स्कॉर्पिओतील सर्वजण साताऱ्यातील रहिवासी होते. गाडीचा चालक संदीप काटकर (३५) आझादपूर येथील रहिवासी होता. तर, आसगावचा अंश समीर चव्हाण हा अवघ्या १८ वर्षांचा होता. याव्यतिरिक्त महेश अनिल पवार (२५), आदित्य अशोक साळुंखे (२१), रितेश राजेंद्र लोखंडे (२५) व सुहास जितेंद्र लोखंडे (२०) हे चौघे तरूणदेखील आसगाव येथील रहिवासी होते. तर, उत्कर्ष आनंदा शिंगटे (२१) आणि निखिल अभिमन्यू शिंगटे (२५) हे दोघे मरडे गावातील रहिवासी होते. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील आसगाव, मरडे आणि आझादपूर या तिन्ही गावे दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# धावत्या बसचे चाक निखळले

**५० प्रवाशांचे प्राण बचावले**



। मुरुड । प्रतिनिधी ।

मुरुड आगाराच्या नव्याने सुरू करण्यात आलेल्या मुरुड-बोरीवली रातराणी एसटी सेवेतील गंभीर निष्काळजीपणा समोर आला असून, धावत्या बसचे मागील चाक अचानक निखळल्याची घटना घडली. ही थरारक घटना रविवारी (दि.२४) रात्री अलिबाग तालुक्यातील कुरूळ परिसरात घडली. सुदैवाने पाठीमागून येणाऱ्या एका सतर्क दुचाकीस्वाराने वेळेत इशारा दिल्याने तब्बल ५० प्रवाशांचे प्राण वाचले.

मिळालेल्या माहितीनुसार, मुरुड आगारातून दि.२२ मे रोजी सुरू करण्यात आलेली मुरुड-बोरीवली रातराणी सेवा रविवारी रात्री साडेदहाच्या सुमारास मुरुडहून बोरीवलीकडे रवाना झाली होती. एमएच-२०-बीएल-३८९९ क्रमांकाची ही बस कुरूळ परिसरात पोहोचताच मागील डाव्या बाजूच्या चाकाचे आठही नट निघून चाक पूर्णपणे वेगळे झाले. •> पान २ वर

> मी स्वत: त्या गाडीत प्रवास करत होतो. कुरूळच्या अलीकडे एक मोटारसायकलस्वार मागून येत चालकाला सतत इशारा देत होता. त्याने गाडीचे चाक निखळल्याचे सांगितल्यावर चालकाने बस थांबवली. त्या मोटारसायकलस्वारामुळेच आम्हा सर्व प्रवाशांचे प्राण वाचले. तो आमच्यासाठी देवदूतच ठरला.
> – जितेंद्र मुंबईकर, प्रवासी

## वेधक

### दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव वेगाने मोटरसायकल चालवल्याने ती रस्त्याच्या खाली जाऊन आदळली. या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अक्षय किसन काटकर असे मृत तरुणाचे नाव आहे. अक्षय काटकर रविवरि (दि.२४) जुना मुंबई-पुणे महामार्गावरून भरधाव वेगाने दुचाकी चालवत असताना, भोकरपाडा गावाजवळ त्याची दुचाकी रस्त्याच्या खाली गेली आणि जोरात आदळली. त्यात अक्षय काटकर याला गंभीर दुखापती होऊन त्याचा मृत्यू झाला. तसेच, त्याच्या पाठीमागे बसलेला सुशांत दौलत पवार हा जखमी झाला.

### निधी वाटपावरून शिंदे गटात कलह

**मुंबई:** विधान परिषद निवडणुका उंबरठ्यावर आहे. परंतु, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील अंतर्गत कलह आता रस्त्यांवर आणि व्यासपीठांवर उघडपणे दिसून येत आहे. निधी वाटपावरून सुरू झालेला वाद आता पक्षात मोठ्या फुटीत बदलला असून, अनेक नेते पक्ष सोडून जात असल्याच्या बातम्याही येत आहेत. हा वाद छत्रपती संभाजीनगरमध्ये सुरू झाला आहे. शिंदे गटाचे प्रमुख नेते आणि माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी स्वतःच्याच सरकारविरोधात मोहीम उघडली आहे. निधी वाटपात आपल्या मतदारसंघात भेदभाव केला जात असल्याचा जाहीर आरोप सत्तार यांनी केला.

### आता पाण्याचाही सातबारा येणार

**मुंबई :** पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासह जल व्यवस्थापन करण्यासाठी आता जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर पाण्याचा सातबारा देशात प्रथम महाराष्ट्रात विकसित करण्याचे नियोजन सुरू आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत आज मंत्रालयातील बैठकीत याबाबतचे भक्कम पाऊल टाकण्यात आले. जलव्यवस्थापन करणाऱ्या ''अक्केरियम''या संस्थेने यासाठी वॉटर ऑडिट आणि बॅलन्सशीटची संकल्पना मांडली असून, ही अभिनव योजना राज्यात सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे.

# आमदाराचा कार्यकर्ता सुधीर चेरकरची गुंडगिरी

**शासकीय कर्मचाऱ्याला जीवे मारण्याची धमकी**

## रेवदंडा पोलिसांकडून अटक

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील आंदोशी येथे अवैध माती उत्खनन प्रकरणाची पाहणी करण्यासाठी गेलेल्या महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यावर भरदिवसा हल्ला करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शिंदे गटाचा कार्यकर्ता आमदार महेंद्र दळवी यांचा निकटवर्तीय मानला जाणारा वरंडे ग्रामपंचायतीचा माजी सरपंच सुधीर धर्मा चेरकर याला सोमवारी (दि.२५) रेवदंडा पोलिसांनी अटक केली आहे. अलिबाग जिल्हा न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने त्याला १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती समोर आली आहे. आमदारांची फूस असल्याने आरोपी सुधीर चेरकरला कायद्याचा धाक राहिला नसून, त्याची गुंडगिरी वाढत चालल्याची चर्चा परिसरात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महसूल विभागाचे चौलचे मंडळ अधिकारी सुदर्शन सावंत हे रविवारी (दि.२४) आंदोशी येथील राजेंद्र शिवराम चेरकर यांच्या शेतात सुरू असलेल्या कथित अवैध माती उत्खननाची पाहणी करण्यासाठी गेले होते. त्यावेळी कोणताही वैध परवाना किंवा रॉयल्टी नसताना माती उत्खनन करणारे सराई येथील दिलीप लक्ष्मण शेळके यांना शासनाच्या दंडात्मक कारवाईबाबत माहिती देत होते. याचवेळी सुधीर चेरकर घटनास्थळी आला आणि पूर्वीच्या एका गुन्ह्यात शिक्षा झाल्याचा राग मनात धरून त्याने सुदर्शन सावंत यांना शिवीगाळ करत दमदाटी सुरू केली. ''मागच्यावेळी पण तू मार खाल्लास, तुझ्यामुळे मला कोर्टात शिक्षा झाली, आता तुझा •> पान २ वर


# माथाडी कामगार उतरले रस्त्यावर

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।



शासकीय गोदामामध्ये काम करणारे माथाडी कामगार त्यांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरले आहेत. अखिल भारतीय माथाडी, सुरक्षारक्षक, श्रमजिवी, आणि जनरल कामगार युनियनच्यावतीने सोमवारी (दि.२५) अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

या आंदोलनामध्ये कामगार नेते अविनाश शमिष्टे, राजाराम कंक, निवृत्ती धुमाळ नरेंद्र पाटील आदी असंख्य माथाडी कामगार सहभागी झाले होते. राज्य शासनाने स्वस्त धान्य दुकानदारांना एफसीआयच्या बेस डेपोतून थेट वाहतूक करून दुकानदारांना धान्य पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. वाहतूक ठेकेदार यांनाच माल हाताळणुकीचे काम देण्याबाबत या निर्णयामध्ये प्रस्तावित आहे. वाहतूकीच्या कामामध्ये माल हाताळणुकीचे काम •> पान २ वर





## तुमची KYC अद्ययावत ठेवा
ज्यामुळे तुमच्या बँकिंग सेवा चालू राहतील



**जर तुमचा KYC तपशील बदलला नसेल तर,**
पत्र/ऑनलाइन बँकिंग/मोबाइल बँकिंग/एटीएम/तुमच्या बँक किंवा बिझनेस करस्पाँड्ट्सकडे (बीसीज) रजिस्टर असलेल्या तुमच्या मोबाइल नंबर/ईमेलद्वारे Re-KYC साठी स्व-घोषणा सादर करा.

**जर तुमचा KYC तपशील बदलला असेल तर,**
अपडेटची माहिती देणाऱ्या कोणत्याही कागदपत्राची एक प्रत द्या: आधार/मतदाता ओळखपत्र/NREGA जॉब कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट/नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टरने जारी केलेलं पत्र.

**आपल्या बँकेच्या जवळच्या शाखेत जाऊनही KYC अपडेट करू शकता.**




अधिक माहितीसाठी,
https://rbikehtahai.rbi.org.in/KYC वर जा
अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप नंबर्स:
99990 41935/99309 91935

सार्वजनिक हितार्थ जारी
भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

# निधीअभावी जलजीवन योजना रखडली

## उरणमधील २५ हजार नागरिकांना पाणी टंचाईच्या झळा



| चिरनेर | प्रतिनिधी |

निधी अभावी रखडलेली ११ कोटींची जलजीवन योजना, शासनाची विविध प्रकारची अपूर्ण राहिलेली कामे, जुन्या गळक्या जलवाहिन्या आणि पुनाडे धरणाने तळ गाठल्याने उरण तालुक्यातील ८ गावांतील २५ हजार नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

उरण पुर्व विभागातील पिरकोन, सारडे, वशेणी, पुनाडे, पाले, गोवठणे, आवरे, कडापे इत्यादी २५ हजार लोकसंख्येच्या गावातील नागरिकांना पुनाडे धरणातून पाणी पाणीपुरवठा केला जातो. रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या या धरणाच्या जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या सातत्याने फुटण्याच्या घटना वाढीस लागल्या आहेत. तसेच, आधीच गळती लागलेल्या पुनाडे धरणाने तळ गाठला आहे. त्यामुळे या गावांतील रहिवाशांना करण्यात येत असलेला पाणी पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने ऐन उन्हाळ्यात रहिवाशांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.

उरण पुर्व विभागातील आठ गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महामंडळाकडे सातत्याने पाठपुरावा करून ग्रामपंचायतीने २०२२ साली ११ कोटींची जलजीवन योजना मंजूर करून घेतली होती. त्यामध्ये पाणी शुद्धीकरण केंद्र, जॅकवेल, ८ इंच व्यासाची नवीन पाईप लाईन टाकणे, सौर पॅनल इत्यादी दुरुस्ती व नवीन कामांचा समावेश होता. २०२४ पर्यंत या जनजीवन योजनेचे काम पूर्ण करण्याची मुदत होती. या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. मात्र, मे महिना संपत आला तरी सर्वच कामे अद्यापही पुर्ण झालेली नाहीत. शासनाच्या तिजोरीत खडखडाट असल्यानेच निधीच्या कमतरतेमुळे जनजीवन योजना मागील ४ वर्षांपासून रखडलेली आहे. त्यामुळे उरण तालुक्यातील आठ गावांतील २५ हजार नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असुन, संताप व्यक्त केला जात असल्याची माहिती सरपंच तथा पुनाडे प्रादेशिक पाणीपुरवठा नळ योजना कमिटीच्या सदस्या अनामिक म्हात्रे यांनी दिली.

> निधीच्या कमतरतेमुळे जनजीवन योजने अंतर्गत सुरु करण्यात आलेले पुनाडे पाणी पुरवठा योजनेचे काम रखडलेले आहे. दरम्यान, योजनेच्या खर्चासाठी अतिरिक्त आणखी १ कोटीची वाढ करण्यात आली आहे. पुनाडे पाणी पुरवठा योजनेतून आतापर्यंत नवीन तसेच दुरुस्तीची ७८ टक्के कामे झाली आहेत. योजनेचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी गुरुवारी (दि.२१) बैठकही आयोजित करण्यात आली होती.
>
> – प्रशांत पांढरपट्टे, उपअभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

> पुनाडे धरणाची गळती–दुरुस्ती व जलवाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी अडीच कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. पावसाळ्यापुर्वी ही कामे पूर्ण करण्यात येईल.
>
> – मिलिंद पवार, कार्यकारी अभियंता, इरिगेशन विभाग

# शिवकर इंग्लीश मिडीयम प्रकरण तापले

## ■ अलिबागमध्ये एकमेकांविरोधात लढा



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबागमध्ये एका शिक्षण संस्थेसाठी एकमेकांविरोधात लढा झाल्याचा प्रकार सोमवारी (दि.२५) दुपारी घडला. पनवेल येथील एका शिक्षण संस्थेच्या कारभाराविरोधात अनिल ढवळे यांनी उपोषण सुरु केले आहे. मात्र, हे उपोषण ढोंगी असल्याचा ठपका ठेवत शिवकर येथील ग्रामस्थांनी उपोषण मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, हे उपोषण खोटे असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तर, ही लढाई सत्यासाठी असल्याचे उपोषणकर्त्यांकडून सांगण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल तालुक्यातील शिवकर येथील श्री गणपती देवस्थान ट्रस्ट या संस्थेच्या श्री गणपती इंग्लीश मिडीअम स्कूल या संस्थेच्या मुख्य विश्वस्त म्हणून दिलेले हमीपत्र खोटे व बनावट आहे. त्यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, असा आरोप करीत पनवेलमधील शिवकर येथील अनिल ढवळे यांनी अलिबागमध्ये माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु केले. मात्र, हे उपोषण ढोंगी असल्याचा आरोप करीत शिवकर येथील ग्रामस्थांनी देखील या कार्यालायसमोर आंदोलन केले. या आंदोलनात शेकडो ग्रामस्थ सहभागी झाले होते. ढवळे यांचा आरोप खोटा असून, ते त्रास देण्यासाठी उपोषण करीत असतात. त्यांचे कोणतेच उपोषण अद्याप यशस्वी झाले नाही, अशी प्रतिक्रीया तेथील ग्रामस्थांनी दिली.

दरम्यान, ढवळे हे उपोषणाला बसले असताना, त्यांच्या उपोषणाला रोखण्यासाठी जमाव जमला होता. या घटनेची माहिती अलिबाग पोलिसांना मिळताच १५ हून अधिक पोलीस अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्याकडून संतप्त झालेल्या मंडळींनी शांत करण्यात आले. मात्र, दुपारपर्यंत कोणताही तोडगा निघाला नाही. त्यामुळे त्या परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांची उपसंचालक कार्यालयाला भेट

| महाड | प्रतिनिधी |

शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे हे सातत्याने शिक्षकांसाठी दिवस–रात्र मेहनत करत आहेत. नुकतेच त्यांनी मुंबईतील शिक्षण उपसंचालक कार्यालयाला भेट देऊन अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली कामे करून घेतली. त्यात कनिष्ठ लिपिक रजित कदम, विद्याधर पाटील, अस्मिता म्हशिलकर, शिपाई समिर नांदगावकर, सचिन निरगुड, स्वप्निल अधिकारी व सीमा शिंदे या सात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असले शालार्थ ओळखपत्राच्या मान्यता मिळवून दिल्या. तसेच, प्रलंबित कामे, डिजिटलायझेशनच्या समस्या, पद दुरुस्ती, संच मान्यता, अनुदान आदेश, मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेतर पोस्ट क्रिएट करणे, संच मान्यता दुरुस्ती इत्यादी विषयांवर चर्चा करून अनेक प्रश्न तात्काळ सोडवण्यात आले. यावेळी शिक्षण उपसंचालक राजेश कंकाळ, सहाय्यक उप संचालक सुनील सावंत, अधीक्षक गोमासे, लेखा अधिकारी दळवी व संबंधित लिपिकांशी विविधि समस्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी रायगड जिल्ह्याचे प्रमुख पदाधिकारी रवींद्र पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मुरूडकरांच्या बोटी लागल्या किनारी



● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

| आगरदांडा | प्रतिनिधी |

राज्यातील सागरी मत्स्य संपत्तीचे संवर्धन आणि मासळीच्या प्रजनन काळाचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारने पावसाळ्यात मासेमारी बंद केली आहे. अवघ्या काही दिवसांवर पावसाळा ठेपला असून, कोळी बांधवांनी आपल्या बोटी किनाऱ्यांवर आण्यास सुरुवात केली आहे.

राज्य शासनाच्या आदेशानुसार दि.१ जूनपासून समुद्रात मासेमारी करता येणार नाही. हा बंदी कालावधी ३१ जुलैपर्यंत लागू करण्यात आला आहे. या काळात आदेशाचे उल्लंघन केले गेले तर त्या मच्छीमारांवर कडक कारवाई केली जाईल, असे मत्स्य विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे. या दोन महिन्यांत मासळीच्या जीवांना प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते. मासेमारी बंदीमुळे मासळीच्या बीजनिर्मिती प्रक्रियेला वाव मिळून मासळीच्या साठ्याचे जतन होते. तसेच, या कालावधीत खराब व वादळी हवामानामुळे होणारी मच्छीमारांची जीवित व वित्तहानी मासेमारी बंदीमुळे टाळता येणे शक्य होते. ही बंदी यंत्रचलीत व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहणार आहे. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका दि.१ जूनपूर्वी बंदरात परतणे बंधनकारक आहे; तसेच, ३१ जुलैपूर्वी समुद्रात मासेमारीसाठी कोणालाही जाता येणार नाही, असे मत्स्य विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे.

# चित्रपट महामंडळात राजकीय हस्तक्षेप?

| मुंबई | प्रतिनिधी |

अखिल भारतीय चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत सध्या हाय–व्होल्टेज ड्रामा पहायला मिळत आहे. महामंडळावर राजकीय वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न एका मंत्र्यांकडून होत आहे, असा आरोप अभिनेते विजय पाटकर यांनी केला. त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी थेट उदय सामंत यांच्यावर टीका केली आहे.

अभिनेते विजय पाटकर यांनी, एका मंत्र्यांचा ओएसडी मागच्या चार दिवसांपासून कोल्हापुरात आहे आणि तो लोकांवर दबाव आणत आहे. त्यांच्यावतीने हा व्यक्ती नको तो व्यक्ती नको, असे सांगितले जात आहे. मोठा दबाव आणला जात आहे. मला कळत नाही त्या मंत्र्यांची आणि ओएसडी यांची विधानभवनातील सगळी कामे संपली आहेत का? मागील ४० वर्षे आम्ही इंडस्ट्रीत आहोत. आम्ही कधी राजकारण्यांकडे येतो का? त्यांनी कशाला इकडे यायला हवे,'' असा संतप्त सवाल केला होता. यावर सुषमा अंधारे यांनी, मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीमध्ये नीलम उदय सामंत यांची निवड व्हावी यासाठी संपूर्ण सरकारी यंत्रणा कामाला लागली. विजय पाटकर यांच्यासारख्या अत्यंत ज्येष्ठ अभिनेत्यालासुद्धा अर्ज भरण्यापासून रोखण्यात आल्याची माहिती मिळत आहे. नेते अभिनेत्यांसारखे वावरतात तिथपर्यंत ठीक आहे, पण नेते अभिनेत्यांच्या हक्काचे कलाक्षेत्रही बळकावत असतील तर मात्र दुर्दैवी आहे, अशी पोस्ट लिहिली आहे.

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक पुरुषोत्तम वासुदेव वार्डे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-कोप्रोली, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग २१, एकूण क्षेत्र ००-१७-२० ( हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ४.४४/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २६/०५/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## पान १ वरून

### आंबेनळी घाटात मृत्युचे तांडव

क्रॅश बॅरियर्स एका ठिकाणी तुटल्याचे, तसेच एका धक्क्यावर टायरमार्क्स दिसून आल्याने अपघाताचा सुगावा लागला. त्यानंतर पोलादपूचे सहाय्यक पोलीस निरिक्षक आनंद रावडे, तहसिलदार कपिल घोरपडे तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. परंतु, रात्रीच्या काळोखात कोसळलेल्या स्कॉर्पिओ गाडीचा आणि प्रवाशांच्या मृतदेहांचा शोध घेणे अशक्य होते. त्यामुळे सोमवारी सकाळी रेस्क्यूची सुरूवात करण्यात आली.

यावेळी पोलादपूर पोलीस, महामार्ग वाहतूक पोलीस, पोलादपूर तहसीलदार व कर्मचारी, प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीम, महाबळेश्वर ट्रॅकर्स आणि सी–स्केप–महाडचे रेस्क्यू टिमचे जवानांनी दोरखंडाच्या साहाय्याने दरीत उतरून रेस्क्यू सुरू केले. दरी खूपच खोल असल्याने प्रशासनाने ड्रोन कॅमेऱ्याच्या साहाय्याने खोल दरीत काळया रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीचा शोध लावला. ही गाडी टप्पे खात आदळत आपटत खोल दरीत स्थिरावली होती. या गाडीचा रंग काळा असून, अनेक ठिकाणी जळल्यासारखा तांबडा पत्रा दिसून आला. त्यामुळे दरीत कोसळल्यानंतर गाडीने पेट घेतल्याची शक्यता वर्तविली जात आहे. रेस्क्यू दरम्यान ज्या–ज्या ठिकाणी स्कॉर्पिओ गाडी आदळत दरीमध्ये गेली; त्या–त्या ठिकाणी एकेका व्यक्तीचे मृतदेह आढळून आले. यावेळी स्कॉर्पिओ गाडीतील तरूणांची संख्या ८ असल्याचे आढळून आल्याने मृतदेह बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. यावेळी रूग्णवाहिका आणि अन्य शासकीय वाहनांसह रेस्क्यूटिमचे प्रमुख सागर दहिर्वेकर यांनीही अपघातस्थळी पोहोचून रेस्क्यू टिमच्या सदस्यांना मार्गदर्शन करण्यास सुरूवात केली. त्यानंतर पहिला मृतदेह केवळ तासाभरातच दरीबाहेर काढण्यात रेस्क्यू टिमला यश आले.

दरम्यान, आंबेनळी घाटातील अपघातप्रवण क्षेत्रातून मार्गक्रमण करणाऱ्या वाहनांची दाटी वाढून बघ्यांची गर्दी वाढू नये यासाठी अपघातस्थळी पोलादपूर पोलीसांनी सहाय्यक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवला होता. सोमवारी दुपारनंतर सर्व रेस्क्यूटीमचे सदस्य, पोलादपूर पोलीस, प्रशासन तसेच रूग्णवाहिका कर्मचारी यांनी सर्व ८ जणांचे मृतदेह दरीतून बाहेर काढून ग्रामीण रूग्णालयामध्ये शवविच्छेदन व उत्तरीय तपासणीसाठी रवाना केले. त्यानंतर उपनिरिक्षक सतीश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण रूग्णालयामध्ये मृतांच्या नातेवाईकांना तसेच मृतदेहाच्या उत्तरीय तपासणीकामी डॉक्टरांना तातडीने सहकार्य करण्याची भूमिका बजावण्यात आली.

**चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात**

आंबेनळी घाटातील दाभिळटोक येथील अपघातप्रवण क्षेत्रातील दरीच्या बाजूला तकलादू स्वरूपाच्या क्रॅश बॅरियर्सचा वापर करून तयार करण्यात आले आहे. या ठिकाणी तीव्र वळणानंतर सरळ घाटरस्ता आणि पुन्हा वळण असा रस्ता आहे. त्यामुळे वाहन वळल्यानंतर दरीच्या बाजूला झोक जाऊन अथवा नियंत्रण सुटून थेट तकलादू क्रॅश बॅरियर्सला धडकून दरीत झेपावण्याची शक्यता निर्माण होते. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटकडून याठिकाणी डोंगर फोडून रस्ता रूंदीकरण करण्यासोबत अपघातप्रवण क्षेत्राची तीव्रता कमी करण्याची आवश्यकता आहे. परिणामी, स्कॉर्पिओ (एमएच–११–डीएम–२३४०) या गाडीचा चालक संदीप काटकर (३५) याला तीव्र वळणाचा अंदाज न आल्याने गाडीवरील नियंत्रण सुटून संरक्षक कठड्याला धडकून १००० ते १५०० फूट दरीत कासळल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### आमदाराचा कार्यकर्ता सुधीर चेरकरची गुंडगिरी

गेम करतो,'' असे म्हणत त्याने सावंत यांची कॉलर पकडून मारहाण केली. तसेच ''पोलीस ठाण्यात तक्रार दिलीस तर संध्याकाळपर्यंत तुझा मर्डर करून टाकीन,'' अशी उघड धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सोमवारी आरोपीला अटक केली.

विशेष म्हणजे, सुधीर चेरकर याच्यावर यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला, मारामारी, धमकी, दंगल, अतिक्रमण, तसेच रेवदंडा ग्रामीण रुग्णालयातील एका महिलेला मारहाण केल्याच्या प्रकरणाचाही समावेश असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवरच भरदिवसा हल्ले होत असतील तर प्रशासनाचा धाक उरला आहे का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

आरोपी सुधीर चेरकरला आमदारांकडून वारंवार राजकीय संरक्षण मिळत असल्याने त्याची हिंमत वाढली असल्याचीही चर्चा परिसरात सुरू आहे. रविवारी झालेल्या गुन्ह्यात राजकीय हस्तक्षेपामुळे गुन्हा दाखल करण्यात उशीर झाल्याचे बोलले जात आहे. या घटनेनंतर आंदोशी परिसरात मोठी खळबळ उडाली असून, आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या घटनेचा अधिक तपास रेवदंडा पोलीस करीत आहेत.

### धावत्या बसचे चाक निखळले

याचवेळी पाठीमागून येणाऱ्या मोटारसायकलस्वाराच्या हा प्रकार लक्षात आला. प्रसंगावधान राखत त्याने तातडीने बसचालकाला गाठून चाक निखळल्याची माहिती दिली. चालकाने तात्काळ बस थांबवल्याने संभाव्य भीषण अपघात टळला. रात्रीची वेळ आणि वेगात धावणारी बस पाहता मोठी जीवितहानी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या घटनेमुळे मुरुड आगाराच्या बस देखभालीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विशेष म्हणजे, याच कुरूळ परिसरात मुरुड आगाराच्या बसचे चाक निखळण्याची ही दुसरी घटना असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आगारातील बसेसचे मेंटेनन्स व्यवस्थित होत नसल्याचा आरोप प्रवासी आणि नागरिकांकडून केला जात आहे. या घटनेनंतर मुरुड आगार व्यवस्थापकांच्या कामकाजावर संताप व्यक्त होत असून, ''प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू आहे का?'' असा सवाल उपस्थित केला जात आहे. निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाई करून सक्षम आगार प्रमुख नेमण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

कुरूळ परिसरातील दुसरी घटना

मुरुड आगाराच्या एसटी बसचे चाक निखळण्याची ही पहिली घटना नाही. यापूर्वीही याच परिसरात अशीच घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. वारंवार होणाऱ्या घटनांमुळे एसटीच्या तांत्रिक तपासणी आणि देखभालीवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेबाबत प्रशासन किती गंभीर आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

### माथाडी कामगार उतरले रस्त्यावर

करण्यासाठी वाहतूक ठेकेदाराला त्यांचे कामगार लावण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय धान्य गोदामामध्ये काम करणाऱ्या हजारो कामगारांचा रोजगार संपुष्टात येण्याची भिती माथाडी कामगारांनी व्यक्त केली आहे.

ट्रकमधून दुकानदारांना धान्य देण्याच्या प्रक्रियेमध्ये हाताळणुकीसाठी लागणारे कामगारही कंत्राटदारांनी त्यांचे स्वतःचे आणावयाचे आहेत. त्यामुळे सर्व माथाडी कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळण्याची चिंता निर्माण झाली आहे. शासनाच्या या भूमिकेमुळे माथाडी कामगारांसह त्यांच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. विविध शासकीय धान्य गोदामातील पहिला टप्पा व दुसऱ्या टप्प्यासह थेट वाहतूकीतील अन्न धान्य शिधावाटप दुकानांमध्ये वजन करून उचलून थप्पी लावून ठेवणे. माथाडी मंडळाच्या नोंदीत माथाडी कामगारांना सध्या मिळत असणाऱ्या वेतनाची सरासरी काढून त्याचे मासिक वेतन ठरविण्यात यावे. वेतन संरक्षित करण्यात यावे, अशा अनेक मागण्यांसाठी शासकीय धान्य गोदामामध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगार संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि.२५) अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात रायगड जिल्ह्यातील २५० हून अधिक कामगार सहभागी झाले आहेत. यावेळी कामगारांनी शासनाविरोधात घोषणा देत शासनाच्या भुमिकेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. ही लढाई शेवटपर्यंत सुरु राहणार आहे. अन्यथा उपोषणाची भुमिका घेतील जाईल असा इशारा माथाडी कामगारांनी यावेळी दिला.

# शेवटच्या दिवशी जंजिरा फुल्ल

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड तालुक्यातील राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला मंगळवार दि.२६ मेपासून बंद होणार आहे. त्यामुळे सोमवारी (दि.२५) जंजिरा किल्ला पाहण्यासाठी राजपुरी जेट्टी, खोरा जेट्टी व दिघी बंदर या ठिकाणी राज्यभरातून १,२५० पेक्षा जास्त पर्यटकांनी गर्दी केली होती. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी शिडाच्या व इंजिनच्या बोटींमधून ने–आण केली जाते. पर्यटन हंगामात शिडाच्या बोटींना चांगला व्यवसाय मिळत असतो. परंतु, आता मंगळवार पासून किल्ला बंद होणार असल्याने शिडाच्या बोटींसह स्थानिकांचा व्यवसाय ठप्प होणार आहे. पुरातत्व विभागाचे बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे यांनी सांगितले की, सोमवारी जंजिरा किल्ला पाहणाऱ्या पर्यटकांची खुप गर्दी दिसुन आली. त्यात १६ वर्षांवरील स्त्री–पुरुष पकडुन ८५० जण, तर ऑनलाईन अंदाजे ४०० पेक्षा जास्त संख्या होती.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा व तुकडी रायगड, पोट तुकडी व तहसील अलिबाग येथील मे. दुय्यम निबंधक, अलिबाग यांचे आधिकारक्षेत्रातील, गाव कोळगांव या महसुली गावचे ७/१२ पत्रकी नोंद असलेले मिळकतीचे वर्णन : गट क्र. १८३ (जुना स.नं. ६२/१) शेत मिळकत क्षेत्र हे. ०.०९.८० आर. चौ. मी. आणि पोट खराब हे ०.०१.३० आर. चौ. मी. असे एकूण क्षेत्र हे. ०.११.१० आर.चौ.मी. तसेच आकारणी रक्कम रू.२.५६, येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही जागा मालक प्रणिता प्रमोद राऊत, क्षमा शिरीष राऊत, शर्मिला गणेश, गीता प्रणय राऊत, प्रसाद दयाराम घरत, परेश दयाराम घरत, प्रतिभा संतोष घरत, आकांशा चिन्मय पाटील, प्रताप लक्ष्मण ठाकूर, दिलीप लक्ष्मण ठाकूर, कल्पना लक्ष्मण ठाकूर, शैला बाबू सुतार, संगीता किसन कांरडे, अनिल लक्ष्मण ठाकूर यांचे संपूर्ण सामाईक हिस्से, त्यांच्या कायदेशीर मालकी व कब्जेवहिवाटीची असून सदरची मिळकत आमचे अशिलांना जागा मालक/मुळ मालक यांनी खरेदी देण्यास मान्यता व कबूली दिलेली आहे. सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा वर नमूद मिळकत मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तरी नमूद मिळकती संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा बोजा, कसलेही कर्ज याउपरही सदरील मिळकतीवर तारण गहाण, बक्षीसपत्र, हक्क, हितसंबंध, कोणत्याही प्रकारचा तत्सम व्यवहार असलेस ही नोटीस प्रसिद्धीच्या तारखेपासून (१४) चौदा दिवसांच्या आत योग्य त्या मुळ कागदपत्रानिशी खालील पत्त्यावर संपर्क साधून मुदतीत हरकत घेणेची आहे. मुदतीत कोणाची हरकत न आलेस वर नमूद केली मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे समजून खरेदीचा पुढील व्यवहार पुर्ण केला जाईल. तदनंतर कोणचीही कसलीही तक्रार/हरकत आमचे अशिलांचेवर बंधनकारक राहणार नाही.

म्हणून दिली जाहीर नोटीस आज मु.अलिबाग
दि.२६.०५.२०२६

खरेदीदारतर्फे वकील
**चैतन्य सुनिल खंदारे**
ॲडव्होकेट
ऑफीस-१३१७ दलामल टॉवर,
फ्री, प्रेस मार्ग, नरिमन पॉईट, मुंबई
मोबा- ७७७००५१४६०
ई-मेल-chaitanyk7776@gmail.com

या मजकुराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करणेस माझी संमती आहे.
१. प्रणिता प्रमोद राऊत
२. क्षमा शिरीष राऊत
३. शर्मिला गणेश
४. गीता प्रणय राऊत
५. प्रसाद दयाराम घरत
६. परेश दयाराम घरत
७. प्रतिभा संतोष घरत
८. आकांशा चिन्मय पाटील
९. प्रताप लक्ष्मण ठाकूर
१०. दिलीप लक्ष्मण ठाकूर
११. कल्पना लक्ष्मण ठाकूर
१२. शैला बाबू सुतार
१३. संगीता किसन कांरडे
१४. अनिल लक्ष्मण ठाकूर

**कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा
**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे:

**अनु क्र. 1, कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील एसएसई/वर्क्स/चिपळूण विभागांतर्गत रोहा - कोलाड विभागामधील कि.मी. 103-106 दरम्यान कोलाड आरयुबी ते कुंडलिका II पुलापर्यंत रेल्वे मार्गास समांतर असलेल्या रस्त्याची दुरुस्ती करणे. **निविदा सूचना क्रमांक: केआर-आरएन- डिवायसीईडब्ल्यू-रोड-6-2026 दिनांक: 26/05/2026**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 11,69,433.74/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 02/06/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 16/06/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 3 महिने मान्सून वगळून.

**अनु क्र. 2, कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील एसएसई/वर्क्स/रत्नागिरी विभागांतर्गत आरआरएम कार्यालय, रत्नागिरी यांची देखभाल व स्वच्छता करणे. **निविदा सूचना क्रमांक: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-अपकिप-5-2026 दिनांक: 26/05/2026**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 5,91,672.00/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 26/05/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 09/06/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 24 महिने.

हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**
ज.म.र अर्ज ४२८/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. मैजबीन अहमद कारभारी,
रा. नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड, — अर्जदार
विरुद्ध
निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. १२/०१/१९७४ रोजी मौजे नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. १२/०१/१९७४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ९/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**ठाणे अंमलदार**
मुरुड पोलीस ठाणे

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## निवडक



### शालार्थ आयडी मान्यता वितरण

**महाड :** कोकण शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या दक्षिण रायगड संपर्क कार्यालयात शालार्थ आयडी मान्यता वितरण कार्यक्रम पार पडला. यावेळी संपर्कप्रमुख राजेंद्र पवार यांच्या हस्ते सचिन निरगुडे यांना शालार्थ आयडी मान्यतेचे पत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी शहाजी बेरे, रंजीत कदम, लोटन गवळी आणि अस्मिता मशिनकर उपस्थित होते. सदर प्रकरण अनेक दिवसांपासून मुंबई येथील डीवायडी कार्यालयात प्रलंबित होते. महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा कोकण शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. तसेच शहाजी बेरे यांच्या प्रयत्नांमुळे सचिन निरगुडे यांना कोणताही खर्च न करता शालार्थ आयडी मान्यता मिळाल्याचे यावेळी सांगण्यात आले.




### खांदा कॉलनीत शिवसेनेची आढावा बैठक

**पनवेल :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खांदा कॉलनी शहर शाखेत आयोजित आढावा बैठक आणि स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी रायगड जिल्हाप्रमुख दीपक निकम यांचा उपमानगर संघटक शिवाजी दांगट यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण, रायगड जिल्हाप्रमुख दीपक निकम, उपजिल्हाप्रमुख रामदास दादा पाटील, पनवेल महानगर प्रमुख समाधान काशीद यांचे खांदा कॉलनी शहर शाखेतर्फे भव्य स्वागत करण्यात आले. शिवसैनिकांच्या उत्साहात आणि जल्लोषात हा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. बैठकीदरम्यान संघटनात्मक आढावा घेण्यात आला तसेच आगामी राजकीय आणि संघटनात्मक नियोजनावर चर्चा करण्यात आली. यावेळी उपमानगर प्रमुख रामदास गोंधळी, उपशहर प्रमुख मामुलकर, होटकर, सदानंद शिर्के, लीलाधर भोईर, संतोष जाधव, परब, संजीव गमरे, शिवाजी बंडगर, घाडगे मावशी यांच्यासह महिला पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पर्स हिसकावणारी टोळी गजाआड

**पनवेल :** मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या महिलेची पर्स जबरदस्तीने हिसकावून पळ काढणाऱ्या टोळीचा तळोजा पोलिसांनी पर्दाफाश केला असून, एका विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. शशिकला मिश्रा (४९, रा. तळोजा) या मॉर्निंग वॉक करत असताना दुचाकीवरून आलेल्या तिघांनी त्यांच्या जवळील पर्स हिसकावून पळ काढला होता. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याच्या तपासादरम्यान आरोपींच्या वर्णनाव्यतिरिक्त कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नव्हता. तरीही सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश येवले आणि डीबी पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवत तळोजा, खारघर, कामोठे, सानपाडा, वाशी, मानखुर्द, चेंबूर, गोवंडी आणि टिळकनगर परिसरातील तब्बल १२० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने एका विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान तळोजा, कामोठे आणि खारघर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत त्याच्याविरोधात गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले. या बालकाला बाल कल्याण समिती, कर्जत यांच्यासमोर हजर करण्यात आले असून, समितीच्या आदेशानुसार त्याला कर्जत येथील बालसुधारगृहात ठेवण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, दीपक साकोरे, रश्मी नांदेडकर, विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# माथेरानवरील पाणीसंकट गडद

## • पावसाळा लांबल्याचा परिणाम • नगराध्यक्षांकडून शर्थीचे प्रयत्न

**| नेरळ | प्रतिनिधी |**

थंड हवेचे पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानमध्ये सध्या पर्यटकांची मोठी गर्दी होत असून, वाढत्या मागणीमुळे पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शहरात पाण्याचे नियोजन बिघडल्याने स्थानिक नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पावसाळा लांबण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने माथेरानमधील पाणीसंकट अधिक गडद झाले असून, नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी परिस्थिती हाताळण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत.



माथेरानला मुख्यत: शार्लोट तलाव आणि नेरळ-कुंभे येथून पाणीपुरवठा केला जातो. नेरळ-कुंभे येथून माथेरानपर्यंत पाणी पोहोचण्यासाठी दीड तासांहून अधिक वेळ लागतो. वीजपुरवठा खंडित झाल्यास शार्लोट तलावातील पाण्यावर अवलंबून राहावे लागते. मात्र, यंदा सर्व काही सुरळीत असतानाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून डिसेंबर महिन्यापासून शार्लोट तलावातून मोठ्या प्रमाणात पाणीउपसा करण्यात आला. परिणामी, मे महिन्यातच माथेरानमध्ये पाणीटंचाईची तीव्रता जाणवू लागली आहे.

स्थानिक नागरिकांना अनियमित पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. दुसरीकडे मोठ्या हॉटेल व्यावसायिकांना मात्र सुरळीत पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. शार्लोट तलाव तळ गाठण्याच्या स्थितीत पोहोचल्याने माथेरानमधील पाणीसंकट अधिक गंभीर बनले आहे.

डिसेंबरपासून शार्लोट तलावातून सातत्याने पाणी उपसा सुरू ठेवण्यात आला, तर नेरळ येथून अत्यल्प प्रमाणात पाणी घेण्यात आल्याने एप्रिल आणि मे महिन्यात परिस्थिती अधिक बिकट झाली. यामुळे स्थानिकांसह पर्यटक व्यवस्थापनाचे मोठे आव्हान नगरपालिकेसमोर उभे राहिले आहे. दरम्यान, नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी गेल्या महिनाभरापासून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू ठेवले आहेत. नवीन पंप खरेदी, अधिक वेळ पाणीउपसा आणि वितरण व्यवस्थेचे काटेकोर नियोजन यावर भर देण्यात येत असून, नगराध्यक्ष स्वतः पाणी वितरण व्यवस्थेवर लक्ष ठेवून आहेत.

### उद्यानांना अग्निशमन बंबातून पाणीपुरवठा

माथेरान शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या दोन उद्यानांमधील आकर्षक फुलझाडे पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत असतात. या उद्यानांतील झाडे वाचवण्यासाठी नगरपालिकेने अनोखी उपाययोजना केली आहे. पालिकेच्या अग्निशमन बंबाच्या सहाय्याने ब्रिटिशकालीन पेमास्टर विहिरीतून पाणीउपसा करून ते उद्यानांमध्ये सोडले जात आहे. नगरपालिकेच्या या प्रयत्नामुळे उद्यानांतील हिरवळ टिकवून ठेवण्यास मदत होत आहे.

# हिराजी कांडणेकरांसारखा कार्यकर्ता होणे नाही

## ■ चित्रलेखा पाटील यांच्याकडून श्रद्धांजली अर्पण

**| चणेरा | प्रतिनिधी |**

गोवर्धन कांडणेकर यांच्या साथीने हिराजी कांडणेकर यांनी महादेवखारमध्ये शेकापची ताकद वाढवली. ग्रामपंचायत निवडून आणण्यात त्यांचे योगदान मोठे होते. गावाच्या विकासासाठी त्यांनी आयुष्यभर झटत काम केले. अशा निष्ठावान कार्यकर्त्यांमुळेच शेकाप आजही रायगड जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात ताकदीने उभा आहे, असे गौरवोद्गार शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी काढून हिरजी कांडणेकर यांना श्रद्धांजली अर्पण केली.



महादेवखार गावातील ज्येष्ठ समाजसेवक आणि शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते हिराजी नथू कांडणेकर (वस्ताद) यांच्या स्मरणार्थ आयोजित शोकसभेत त्या बोलत होत्या. यावेळी परिसरातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिराजी कांडणेकर यांनी ग्रामविकासासाठी आयुष्यभर कार्य करत महाळुंगे ग्रामपंचायतीवर शेकापचा झेंडा फडकवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. संघटन कौशल्य, लोकांशी असलेला जिव्हाळा आणि गावाच्या विकासासाठी असलेली तळमळ यामुळे ते ग्रामस्थांच्या मनात विशेष स्थान निर्माण करून होते.

यावेळी ॲड. रोशन पाटील यांनी आपल्या मनोगतातून हिराजी दादांच्या कार्याचा गौरव करत, आरोप-प्रत्यारोप हे राजकारणात होतच राहतात; मात्र सकारात्मक दृष्टिकोन ठेवून गावाच्या विकासासाठी संघर्ष करणारे योद्धा म्हणजे हिराजी दादा, अशा शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली.

शोकसभेला शेकाप तालुका चिटणीस शिवराम महाबळे, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन शंकरराव म्हसकर, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन गोपीनाथ गंभे, व्हा. चेअरमन विकास भायतांडेल, कार्यालयीन चिटणीस संदेश विचारे, मजूर फेडरेशनचे हेमंत ठाकूर, पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष संतोष दिवकर, उपाध्यक्ष अमोल शिंगरे, सरपंच संकेत जोशी, नारायण गायकर, विनायक धामणे, पांडुरंग ठाकूर, राज जोशी, महादेव शाबासकर, मनोहर वारगे, अमित कांबळे, चंद्रकांत कांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी हिराजी कांडणेकर यांच्या निधनाने महादेवखार गावाने एक निष्ठावान समाजसेवक, संघटक आणि ग्रामविकासासाठी आयुष्य वेचणारे नेतृत्व गमावल्याची भावना व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



# रायगडावर राज्याभिषेक सोहळ्याची जय्यत तयारी सुरू

**| माणगाव | प्रतिनिधी |**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त ६ जून रोजी रायगड किल्ला येथे भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असून, त्यासाठी प्रशासन आणि शिवप्रेमी संस्थांकडून जोरदार तयारी सुरू असल्याची माहिती शिवप्रेमी भूषण शिसोदे यांनी प्रसार माध्यमांना दिली.

राज्याभिषेक दिनानिमित्त किल्ल्यावर स्वच्छता मोहीम, सजावट, रोषणाई तसेच भाविक आणि पर्यटकांसाठी आवश्यक सुविधांची उभारणी करण्यात येत आहे. गडावरील प्रमुख मार्गांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सुरक्षा बंदोबस्त आणि वैद्यकीय सुविधा यांवर विशेष भर देण्यात आला आहे. यंदाच्या सोहळ्यासाठी राज्यभरातून हजारो शिवभक्त रायगडावर उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. शिवराज्याभिषेक दिनाच्या पार्श्वभूमीवर रायगड परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# टोलवसुलीला 'छावा'चा विरोध

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम तब्बल १८ वर्षांपासून रखडलेले असताना आणि अनेक ठिकाणी महामार्ग अद्याप अपूर्ण अवस्थेत असतानाच पेण तालुक्यातील खारपाडा येथे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) टोलवसुली सुरू केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या निर्णयाविरोधात छावा क्रांतिवीर सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य संघटनेने आक्रमक भूमिका घेत कडाडून विरोध दर्शविला आहे.

पनवेल तालुका अध्यक्ष शैलेश घरत यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी टोलवसुली तात्काळ बंद करण्याच्या मागणीचे निवेदन प्रशासनाला दिले. महामार्गाचे काम पूर्ण न होता टोल आकारणे अन्यायकारक असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

गेल्या १८ वर्षांत महामार्गाचे काम पूर्ण झालेले नाही. आजही अनेक ठिकाणी रस्ता अर्धवट अवस्थेत आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी एनएचआयने अचानक टोल सुरू केला आहे, असा आरोप शैलेश घरत यांनी केला.

यावेळी खालापूर तालुका अध्यक्ष भानुदास जांभळे, पनवेल तालुका संघटक अनंत कोंडिलकर तसेच पनवेल आणि खालापूर तालुका कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित होते. छावा क्रांतिवीरचे रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आलेल्या पत्रकाची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे ते कासू या ४२ किलोमीटरच्या पहिल्या टप्प्यासाठी खारपाडा येथे १५ मे २०२६ पासून टोलवसुली सुरू करण्यात आली आहे.

# खारघरमध्ये अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरिक संतप्त

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

खारघर नोडमध्ये सुरू असलेल्या अनियमित आणि कमी दाबाच्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नियमित वेळेत पाणीपुरवठा करण्यात आला नाही, तर पनवेल महानगरपालिकेवर हंडा मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख भरत पाटील यांनी दिला आहे.

महाराष्ट्रात सध्या उष्णतेची लाट सुरू असताना खारघरमधील अनेक सेक्टरमध्ये कधी दिवसा तर कधी मध्यरात्री १२ ते २ वाजण्याच्या दरम्यान अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. अनियमित वेळेमुळे महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे भरत पाटील यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सकाळी आणि रात्री अशा दोन वेळा निश्चित केल्या असल्या तरी प्रत्यक्षात कोणत्याही ठराविक वेळेशिवाय पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. कमी दाबामुळे पाण्याच्या टाक्या भरत नसल्याने नागरिकांच्या दैनंदिन कामांवर परिणाम होत असून आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

सिडको, नवी मुंबई महानगरपालिका आणि एमआयडीसी यांच्याकडून पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याचा आरोप करत या संपूर्ण नियोजनशून्य कारभाराचा शिवसेनेने निषेध केला आहे. महिलांना रात्रभर पाण्यासाठी जागावे लागत असल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

पाणीपुरवठा विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तातडीने सूचना देऊन सकाळ, दुपार आणि संध्याकाळ या वेळांमध्ये नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अन्यथा खारघर परिसरातील महिला आणि नागरिकांच्या सहभागातून पालिकेवर हंडा मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा भरत पाटील यांनी दिला आहे. या निवेदनाची प्रत सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनाही देण्यात आली आहे.

# पनवेल-कर्जत रेल्वे मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात

## खा. श्रीरंग बारणे आज करणार कामांची पाहणी

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

मावळ लोकसभा मतदारसंघातील महत्त्वाकांक्षी पनवेल-कर्जत नवीन रेल्वे मार्गिका प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून, प्रकल्पाचे सुमारे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. या पार्श्वभूमीवर मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे उद्या (मंगळवारी) रेल्वे अधिकाऱ्यांसह संपूर्ण मार्गिकेची पाहणी करणार आहेत.

रेल्वे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत खासदार बारणे सकाळी पाहणी दौरा करणार असून, सर्व स्थानकांसह कर्जत रेल्वे कॉरिडॉरचीही तपासणी केली जाणार आहे. या प्रकल्पामुळे पनवेल आणि कर्जतदरम्यान थेट उपनगरीय रेल्वे सेवा उपलब्ध होणार असून, प्रवाशांचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सोयीस्कर होणार आहे.

२९.६ किलोमीटर लांबीच्या या दुहेरी रेल्वे मार्गिका प्रकल्पाची उभारणी मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३ अंतर्गत सुमारे २,७८२ कोटी रुपयांच्या खर्चातून करण्यात येत आहे. या मार्गामुळे कल्याणमार्गे धावणाऱ्या रेल्वे वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

प्रकल्पांतर्गत मोठे आणि छोटे पूल, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, बोगदे आणि अस्तरीकरणाची बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. कर्जत येथील रेल्वे उड्डाणपूल पूर्ण झाला असून, सध्या रुळ जोडणीचे काम वेगाने सुरू आहे. तसेच पनवेल रेल्वे उड्डाणपुलाचे कामही अंतिम टप्प्यात पोहोचले आहे.

## वीजसमस्येवर नागरिक आक्रमक | स्वाक्षरी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

# करंजाडेत महावितरणविरोधात एल्गार

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

गेल्या सहा वर्षांपासून वारंवार होणारी वीज खंडित आणि भीषण लो-व्होल्टेज समस्येमुळे त्रस्त झालेल्या करंजाडे सेक्टर ५ आणि ५ 'ए' मधील नागरिकांनी आता महावितरणविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

करंजाडेचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या नेतृत्वाखाली परिसरात व्यापक स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली असून, नागरिकांचा या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळत आहे.




करंजाडे सेक्टर ५ आणि ५ 'ए' हा वेगाने विकसित होणारा निवासी परिसर असून, येथून महावितरणला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो. मात्र, या भागातील मुख्य वीजवाहिनी गेल्या अनेक वर्षांपासून जर्जर अवस्थेत असल्याने दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होतो. त्यातच कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे रहिवाशांच्या घरातील एसी, फ्रिज, पाण्याचे पंप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे नुकसान होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

स्थानिकांनी अनेकदा महावितरण कार्यालयाकडे तक्रारी करूनही "निधीअभावी काम रखडले" असे कारण देत प्रश्न प्रलंबित ठेवण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे आता नागरिकांनी संघटित होत स्वाक्षरी मोहिमेद्वारे प्रशासनावर दबाव वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, सेक्टर ५ आणि ५ 'ए' मधील विविध सोसायट्यांचे पदाधिकारी आणि रहिवाशांनी या मोहिमेला पाठिंबा दर्शवला असून, अवघ्या दोन दिवसांत हजारो स्वाक्षऱ्या जमा करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. तरी, वीज समस्येप्रश्नी महावितरणने तात्काळ उपाययोजना केली नाही, तर मोठे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

> नागरिक वेळेवर वीजबिल भरत असताना त्यांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागणे दुर्दैवी आहे. पुढील १५ दिवसांत मुख्य वाहिनी बदलण्याचे काम सुरू झाले नाही, तर हजारो नागरिकांसह महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा आणि ठिय्या आंदोलन करण्यात येईल.
> – रामेश्वर आंग्रे, माजी सरपंच

### उरण चारफाटा सिग्नलमय!

**| उरण | प्रतिनिधी |**

तालुक्यात औद्योगिक विकास झपाट्याने वाढत असताना रस्त्यांवरील वाहतुकीचा ताणही दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. वाढती वाहनसंख्या, बेशिस्त पार्किंग आणि चौकांमधील अतिक्रमणांमुळे उरण शहरातील वाहतूक व्यवस्था कोलमडू लागली आहे. त्यावर उपाय म्हणून आता महत्त्वाच्या चौकांमध्ये सिग्नल यंत्रणा उभारण्यावर भर दिला जात असून, उरणमधील अत्यंत वर्दळीचा चारफाटा चौक लवकरच सिग्नलमय होणार आहे. उरण चारफाटा हा गेल्या काही वर्षांत वाहतूक कोंडीचा मुख्य नाका बनला आहे. विशेषतःदर रविवारी वेळोवेळी भरविण्यात येणाऱ्या आठवडा बाजारामुळे या परिसरात अक्षरशः वाहनांचा महापूर उसळतो.

# निवी परिसर होणार 'पाणीदार'

**| रोहा | प्रतिनिधी |**

दीपक नायट्रेट कंपनी संचलित दीपक फाऊंडेशनच्या माध्यमातून रोहा तालुक्यात जलसंधारणासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत असून, वरसे ग्रामपंचायत हद्दीतील निवी गाव परिसरात लोकसहभागातून पाणलोट बंधाऱ्यांची उभारणी युद्धपातळीवर सुरू आहे. नैसर्गिक ओहळांवर तब्बल पाच ठिकाणी पक्क्या बांधकामाचे बंधारे उभारले जात असल्याने परिसरातील भूजल पातळी वाढून संपूर्ण भाग 'पाणीदार' होणार असल्याची आशा व्यक्त केली जात आहे.



'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे जमिनीतील नैसर्गिक जलस्रोत पुनर्जीवित होण्यास मदत होणार आहे. परिसरातील पाणीसाठा टिकून राहावा, शेतीला पूरक वातावरण निर्माण व्हावे आणि गाव सुजलाम-सुफलाम् व्हावे, हा या प्रकल्पामागील मुख्य उद्देश असल्याचे दीपक फाऊंडेशनचे प्रकल्प समन्वयक अनिकेत निकम यांनी सांगितले. या पाणलोट बंधाऱ्यांचा थेट फायदा शेतकऱ्यांना होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दीपक फाऊंडेशनच्या या उपक्रमाबद्दल ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. "निवी परिसरातील नैसर्गिक ओहळांवर उभारले जाणारे बंधारे भविष्यात जलसंपन्नतेसाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. लोकसहभागातून उभी राहत असलेली ही जलसमृद्धी सुखावणारी आहे," अशी प्रतिक्रिया माजी सरपंच अमित मोहिते यांनी दिली.

दीपक फाऊंडेशनच्या माध्यमातून निवी, तळाघर आणि परिसरातील विविध गावांमध्ये आरोग्य, शिक्षण, कृषी मार्गदर्शन, शिबिरे तसेच शेतकऱ्यांसाठी शासकीय योजनांची माहिती देण्याचे काम सातत्याने केले जात आहे. शेतकऱ्यांना पूरक साहित्य, बी-बियाणे आणि कृषीविषयक मार्गदर्शन देण्यातही फाऊंडेशनचा पुढाकार राहिला आहे. यावेळी अनिकेत निकम, प्रशांत राऊत, राजेंद्र जाधव, संतोष बामुगडे, पप्पू राऊत, प्रतिक मारणे, तसेच परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## ‘अमेरिकी स्वप्ना’चा अंत

भारताचा रुपया घरंगळत चालला आहे. एका डॉलरसाठी सध्या ९६ रुपये मोजावे लागतात. आता कोणत्याही क्षणी ही किंमत १०० रुपयांवर जाईल अशी स्थिती आहे. केंद्रातील भाजप सरकार इराण युद्धामुळे हे सर्व घडले असा बनाव रचू पाहत असले तरी ते खरे नाही. गेल्या वर्षभरात हा रुपया ८५ वरून इथपर्यंत वेगाने घसरला आहे. युध्द सुरु होऊन तीनच महिने झाले. पण रुपया आधीपासूनच खाली येत होता. भारताने देश म्हणून मोठ्या प्रमाणात डॉलर कमावल्याखेरीज या स्थितीत बदल होणार नाही. डॉलर कमावण्याचे दोन-तीन मार्ग आहेत. एक म्हणजे परदेशी कंपन्यांनी आपल्याकडे गुंतवणूक करणे. त्यांचे डॉलर इथे ओतून कारखाने उभारणे. त्यातून इथे नोकऱ्या वाढतात व इथून माल परदेशात जाऊन आणखी डॉलर मिळण्याची आशा वाढते. पण सध्या गुंतवणुकीचा उलटा प्रवास सुरु आहे. परदेशी कंपन्या झपाट्याने गुंतवणूक काढून घेत असून गेल्या एका वर्षात सुमारे ८० हजार कोटी रुपयांइतका डॉलर बाहेर गेला आहे. डॉलर कमावण्याचा दुसरा मार्ग म्हणजे आपल्या कंपन्यांनी अधिक निर्यात करणे. आपण गुड्स किंवा मालाची किती निर्यात करू शकतो याला मर्यादा आहेत. तिथे आपल्याला चीनशी प्रचंड स्पर्धा करावी लागते. साधी पिन असो की सोलर पॅनल्स किंवा मोबाईल्स असोत की आकाशातले उपग्रहाचे सामान, चीन या सर्वांमध्ये माहीर आहे. भारतातून निर्यात होऊ शकणारी गोष्ट म्हणजे आपल्या सेवा. आखातात मजूर किंवा कामगार म्हणून जाणारे लोक हे या सेवेकऱ्यांचे एक उदाहरण असते. दुसरे म्हणजे आयटी क्षेत्रातल्या सेवा. या एकतर इथूनच देता येतात. किंवा कंपन्यांनी अमेरिकेने नेले तर तिथे नोकरी करून डॉलर माघारी धाडणे. यातल्या पहिल्या सेवांना आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा फटका बसणार आहे. दुसऱ्यांना त्याचा अधिक अमेरिकेतील मंदीचा यामुळेच सध्या अमेरिकेतील टेक कंपन्यांनी दणादण माणसांना काढून टाकण्याचा सपाटा लावला आहे. केवळ सन २०२४ आणि २०२५ च्या सुरुवातीलाच अमेरिकेतील तंत्रज्ञान क्षेत्रात अंदाजे ९५ हजारहून अधिक कर्मचाऱ्यांना नोकऱ्या गमवाव्या लागल्या. ही कर्मचारी कपातीची मालिका पुढे चालू राहून २०२६ च्या पहिल्या काही महिन्यांतच तब्बल १४४ पेक्षा जास्त तंत्रज्ञान कंपन्यांमधून सव्वालाखाहून अधिक कर्मचाऱ्यांना अचानक कामावरून काढून टाकण्यात आले.

### व्हिसा नियमातील बदल

या प्रचंड टाळेबंदीचा सर्वाधिक फटका भारतीय कर्मचाऱ्यांना सहन करावा लागला. कारण अमेरिकेतील एकूण एच-१बी व्हिसांपैकी सुमारे ७० ते ७५ टक्के व्हिसा हे भारतीय नागरिकांना दिले जातात. २०२४-२५ मध्ये सुमारे चार लाख व्हिसा देण्यात आले. त्यातले जवळपास २ लाख ८३ हजार भारतीय होते. या सुविधेचा भारतीय कंपन्या व माणसांनी भरपूर फायदा व गैरफायदाही घेतलेला आहे. आज मात्र त्यांच्यावर बेकारीची टांगती तलवार आहे. अमेरिका हा भारतीय इंजिनिअर व तरुणांना स्वर्ग वाटत होता. तिथे जाऊन भरपूर पैसे कमावणे व उत्तम आयुष्य जगणे हे अनेकांचे स्वप्न होते. या अमेरिकी स्वप्नाला किंवा अमेरिकन ड्रीमला आता तडे गेले आहेत. अलिकडच्या काळात अमेरिकेतील तंत्रज्ञान क्षेत्रात आलेली प्रचंड टाळेबंदीची लाट आणि ट्रम्प प्रशासनाच्या वाढत्या कठोर इमिग्रेशन धोरणांमुळे भारतीय कर्मचाऱ्यांसमोर टिकून राहण्याचे अभूतपूर्व संकट उभे राहिले आहे. आकडेवारीनुसार, बलाढ्य बहुराष्ट्रीय तंत्रज्ञान कंपन्या कर्मचारी कपात करतात तेव्हा त्यात सर्वाधिक प्रमाण भारतीय कर्मचाऱ्यांचेच असते. नोकरी गमावणे हे या कर्मचाऱ्यांसाठी केवळ वैयक्तिक आर्थिक फटका नसून त्यांचे कौटुंबिक स्थैर्य, गृहकर्जे, मुलांचे शालेय शिक्षण आणि तिथले कायदेशीर वास्तव्य एका रात्रीत संपुष्टात आणणारे ठरते. अमेरिकेच्या इमिग्रेशन नियमांनुसार एच-१बी व्हिसाधारकाची नोकरी संपुष्टात येते तेव्हा नवीन नोकरी शोधण्यासाठी किंवा आपल्या व्हिसाचा दर्जा बदलण्यासाठी त्याला कमाल साठ दिवसांचा सवलतीचा काळ दिला जातो. मात्र सध्याच्या अत्यंत स्पर्धात्मक नोकरी परिस्थितीत या कालावधीत नवी नोकरी शोधणे म्हणजे एक महाकठीण दिव्य झाले आहे. पहिले मुख्य आव्हान म्हणजे अमेरिकेतील नोकरीभरती प्रक्रियेचा संथपणा. आयटी क्षेत्रातील मंदीमुळे सध्या कंपन्यांमधील मुलाखतींच्या विविध फेऱ्या आणि अंतिम निवडप्रक्रिया पूर्ण होण्यासाठीच महिना ते दीड महिन्याचा कालावधी सहज निघून जात असल्याने साठ दिवसात ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडून नवीन कंपनीकडून व्हिसा हस्तांतरणाचा अर्ज यशस्वीरित्या दाखल करणे हे अत्यंत जिकिरीचे काम झाले आहे.

### कोण येथे परतणार?

ट्रम्प प्रशासनाच्या दुसऱ्या कार्यकाळातील धोरणांमुळे नोकरी शोधण्यातील अडचणींमध्ये तर कमालीची वाढ झाली आहे. गेल्यावर्षी एका विशेष अध्यक्षीय घोषणेनुसार एच-१बी व्हिसाचे नवे अर्ज दाखल करण्यासाठी आणि व्हिसा हस्तांतरणासाठी तब्बल एक लाख नवीन अवाढव्य शुल्क लागू करण्यात आले. हे शुल्क आधीच्या नियमित शुल्काच्या व्यतिरिक्त असून ते नव्या कंपनीला भरावे लागणार आहे. साहजिकच कंपन्या ते भरण्यास का-कू करती आहेत. या अवाढव्य फीमुळे अमेरिकेतील स्टार्टअप्स, लघुउद्योग आणि मध्यम आकाराच्या कंपन्या पूर्णपणे एच-१बी व्हिसा देताना दहा वेळा विचार करीत आहेत. नोकरी गमावलेल्या भारतीय तंत्रज्ञाला कामावर घेण्याची तयारी असतानाही अनेक कंपन्यांना केवळ या प्रचंड आर्थिक बोजापायी व्हिसा हस्तांतरण करणे परवडत नाही. या धोरणामुळे कर्मचाऱ्यांची नोकरी बदलण्याची लवचिकता पूर्णपणे संपुष्टात आली आहे. केवळ मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्याच हे शुल्क भरू शकत असल्याने नोकऱ्यांचे पर्याय प्रचंड मर्यादित झाले आहेत. एकूणच या कठोर नियमांमुळे सध्या अमेरिकेत राहणाऱ्या तब्बल पाच ते साडेसात लाख भारतीय एच-१बी व्हिसाधारक आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबीयांवर हद्दपारी किंवा अमेरिकेतून सक्तीने बाहेर पडण्याची वेळ येऊ शकते. भारताचा ग्रीन कार्ड मिळवण्याचा अनुशेष हा आधीच अनेक दशकांचा आहे आणि सन २०३० पर्यंत रोजगार आधारित ग्रीन कार्डच्या प्रतीक्षेत असलेल्या भारतीयांची संख्या तब्बल २० लाखांपेक्षा जास्त असेल. त्याचवेळी, या व्हिसाच्या सततच्या अनिश्चिततेला कंटाळून अनेक भारतीय तंत्रज्ञ आता भारतात परतण्यास प्राधान्य देत असल्याने अशा तंत्रज्ञांच्या संख्येत तब्बल ४० टक्क्यांची वाढ झाली आहे. अनेक जागतिक कंपन्या आता अमेरिकेत एच-१बी धारकांना कामावर घेण्याऐवजी थेट भारतातच आपले स्वतःचे संशोधन व तंत्रज्ञान केंद्र स्थापन करत असल्याने भारतात परतणाऱ्या तंत्रज्ञांना उत्कृष्ट वेतनाच्या आणि चांगल्या कामाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. मात्र तरीही अमेरिकी स्वप्न सोडून भारतात परत येणे हे सोपे नसेल. इथले भयंकर रस्ते, गर्दी, शिक्षण व नोकऱ्यांच्या कमी संधी, जातीय व धार्मिक तेढ, भ्रष्टाचार, नोकरशाही इत्यादींमुळे येथे राहणे सोपे नाही. मोदी सरकारच्या काळात तर आता खुलेपणाने बोलणे, वागणे कठीण झाले आहे. शिवाय, सरकार कितीही आव आणत असले तरी नोकरशाहीचा ताप कमी झालेला नाही. भ्रष्टाचाराचे मार्ग बदलले आहे. मुंबई, दिल्ली, बंगळुरू, हैदराबाद इत्यादी शहरांमधले जीणे भयंकर होत चालले आहे. यामुळे अमेरिकेतून परतताना भारतीय दहा वेळा विचार करतील अशी अवस्था आहे.

विचार

# ब्रिटनमध्ये मजूर पक्षाच्या अस्तित्त्वाचा लढा

***ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्याकडे प्रचंड बहुमत असले तरी ‘राजकीय विश्वास’ वेगाने संपत चालला आहे. त्यांना कार्यकाळ पूर्ण करायचा असेल, तर तडजोड आणि पारदर्शक व्यवहाराचा आधार घ्यावाच लागेल. अडचणींमधून ते स्वतःला आणि देशाला कसे बाहेर काढतात, हे आता पहावे लागणार आहे. सत्तेच्या खुर्चीचा हा संघर्ष एका व्यक्तीचा नव्हे, तर मजूर पक्षाच्या अस्तित्वाचा लढा बनला आहे.***



प्रा. जयसिंग यादव

ब्रिटनमध्ये जिमी कार्बिन यांच्या नेतृत्वाखाली मजूर पक्षाने पुन्हा डावीकडे झुकण्याचा प्रयत्न केला. कार्बिन यांनी सामाजिक न्याय, सरकारी गुंतवणूक आणि युद्धविरोधी भूमिका यावर भर दिला; पण त्याच वेळी त्यांच्यावर अतिडावे, अव्यवहार्य आणि राष्ट्रीय सुरक्षेबाबत कमकुवत असल्याचे आरोप झाले. ब्रिटिश जनतेने त्यांना पूर्णपणे स्वीकारले नाही. त्या पराभवानंतर कीर स्टार्मर यांना पुढे आणण्यात आले. त्यांनी पक्षाला ‘विश्वासार्ह’ आणि ‘सत्तेसाठी योग्य’ बनवण्याचे आश्वासन दिले. प्रत्यक्षात त्यांनी कार्बिन युगातील अनेक नेत्यांना बाजूला केले. पक्षातील डाव्या गटाची ताकद कमी केली आणि मजूर पक्षाला पुन्हा मध्यवर्ती राजकारणाकडे आणले; पण इथेच स्टार्मर यांची खरी अडचण सुरू झाली. निवडणूक जिंकली खरी; पण ते पक्षाची स्पष्ट वैचारिक ओळख निर्माण करू शकले नाहीत. ते ना पूर्णपणे ब्लेअरवादी मध्यममार्गी ठरले, ना पारंपरिक समाजवादी. परिणामी, मजूर पक्षात एक प्रकारची वैचारिक पोकळी निर्माण झाली. सामान्य मतदारांना हा पक्ष नेमका कोणासाठी आहे, हेच समजेनासे झाले. स्थलांतराच्या प्रश्नावर पक्षाची भूमिका सतत बदलत राहिली. आर्थिक धोरणांमध्ये काटकसरीची भाषा आणि कल्याणकारी राज्याची आश्वासने यांचा विचित्र मेळ दिसला. पर्यावरण, ओळख राजकारण आणि अल्पसंख्याकांवरील प्रश्नांवर भर देताना पारंपरिक कामगार वर्गाच्या आर्थिक असुरक्षिततेकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही, अशी भावना वाढली. या पार्श्वभूमीवर ब्रिटनच्या कामगार वर्गातील अनेक मतदारांना मजूर पक्ष आता आपला राहिला नाही, असे अनेकांना वाटू लागले. लंडनकेंद्रित, उच्चशिक्षित, उदारमतवादी वर्गाचा पक्ष अशी त्याची प्रतिमा बनू लागली.

स्थलांतर, राष्ट्रीय ओळख आणि सांस्कृतिक बदलांविषयी अस्वस्थ असलेला पारंपरिक मतदार अलिकडे ‘रिफॉर्म यूके’कडे आकर्षित होऊ लागला. हे केवळ निवडणूक गणिताचे बदल नाहीत, तर ब्रिटनच्या सामाजिक मानसिकतेतील मोठा बदल आहे. पूर्वी आर्थिक विषमता हा डाव्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता. आता सांस्कृतिक असुरक्षितता आणि राष्ट्रीय ओळख यांसारखे प्रश्न अधिक प्रभावी ठरत आहेत. स्टार्मर आणि मजूर पक्ष या बदलाचे अचूक वाचन करण्यात अपयशी ठरताना दिसतात. स्टार्मर यांच्या नेतृत्वशैलीनेही ही समस्या अधिक गंभीर केली. ते मुळात वकील आणि अभियोजक आहेत. त्यामुळे त्यांची राजकीय शैलीही अत्यंत नियंत्रित, सावध आणि व्यवस्थापकीय स्वरूपाची आहे; पण ब्रिटिश राजकारणात केवळ प्रशासकीय क्षमता पुरेशी नसते. लोकांना भावनिक संवाद साधणारा, संकटात स्पष्ट दिशा देणारा आणि संघर्षाला सामोरे जाणारा नेता हवा असतो. बोरिस जॉन्सन यांच्याभोवती अनेक वाद होते; पण त्यांच्याकडे जनतेशी थेट जोड निर्माण करण्याची क्षमता होती. फरागे यांच्याकडेही ती आहे. स्टार्मर मात्र अजूनही प्रशासकीय अधिकाऱ्यासारखे वाटतात. त्यामुळे आर्थिक संकट, स्थलांतर प्रश्न किंवा पक्षांतर्गत बंडखोरी यांसारख्या प्रसंगी ते जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण करू शकत नाहीत.

स्टार्मर यांच्याभोवती निर्माण झालेले वादही या प्रतिमेला अधिक हानी पोहोचवत आहेत. पीटर मंडेल्सन यांच्यासारख्या जुन्या ब्लेअरवादी नेत्यांना पुन्हा महत्त्व देणे, निकटवर्तीय सल्लागारांचा वाढता प्रभाव, पक्षातील मतभिन्नतेबाबत असहिष्णुता अशा अनेक बाबींमुळे स्टार्मर यांच्यावर ‘नियंत्रणप्रिय’ नेतृत्वाचा आरोप होतो आहे. भारतीय संदर्भात पहायला मिळणारा घराणेशाहीचा आरोप इथे नसला, तरी आपल्या गटातील लोकांनाच पुढे आणणे ही भावना पक्षात नाराजी वाढवत आहे. परिणामी, मजूर पक्षात अस्वस्थता वाढली आहे. हे संकट केवळ स्टार्मर यांच्यापुरते मर्यादित नाही. संपूर्ण युरोपमध्ये डाव्या पक्षांसमोर असेच प्रश्न उभे आहेत. फ्रान्समध्ये समाजवादी पक्ष कोसळला. जर्मनीतील सोशल डेमोक्रॅट्स संघर्ष करत आहेत. इटलीमध्ये उजव्या राष्ट्रवादी शक्ती मजबूत झाल्या. कारण पारंपरिक डावे पक्ष जागतिकीकरणानंतरच्या नव्या वास्तवाला ठोस उत्तर देऊ शकले नाहीत. आर्थिक समानतेची भाषा अजूनही आहे; पण राष्ट्रीय ओळख, सांस्कृतिक बदल आणि स्थलांतर यांसारख्या प्रश्नांवर बचावात्मक दिसतात. परिणामी कामगारवर्गातील मोठा भाग उजव्या राष्ट्रवादी राजकारणाकडे झुकतो आहे. स्टार्मर यांचे आजचे संकट म्हणजे या व्यापक बदलाचे ब्रिटिश रूप आहे. त्यांनी मजूर पक्षाला निवडणूक जिंकून दिली; पण त्याला आत्मा देऊ शकले नाहीत. पक्षाला सत्तेत आणणे आणि दीर्घकालीन वैचारिक दिशा देणे या दोन वेगळ्या गोष्टी असतात. पहिली गोष्ट स्टार्मर यांनी साध्य केली; दुसऱ्यात मात्र ते अपयशी ठरताना दिसतात. म्हणूनच आज ब्रिटनमध्ये विचारला जाणारा खरा प्रश्न ‘स्टार्मर राहतील की जातील?’ हा नाही.

प्रश्न असा आहे, की आधुनिक डावे राजकारण स्वतःची नवी ओळख निर्माण करू शकेल का? कामगारवर्ग, तरुण उदारमतवादी आणि सांस्कृतिकदृष्ट्या अस्वस्थ मध्यमवर्ग या परस्परविरोधी गटांना एकत्र ठेवणारी नवी राजकीय चौकट तयार होऊ शकेल का? स्टार्मर यांचे भवितव्य या प्रश्नांच्या उत्तरांशी जोडले गेले आहे. केवळ पद टिकवण्याची धडपड केली आणि व्यापक वैचारिक संकटाकडे दुर्लक्ष केले, तर त्यांचे नेतृत्व फार काळ टिकणार नाही; पण मजूर पक्षाला नव्याने परिभाषित करण्याचा प्रयत्न केला, तर कदाचित ते आजच्या संकटातून बाहेर पडू शकतील; मात्र त्यासाठी त्यांना प्रशासकीय नेत्यापासून राजकीय नेत्यामध्ये रूपांतर करावे लागेल आणि नेमके तेच त्यांना आजपर्यंत जमलेले नाही. आजची परिस्थिती अशी आहे की स्टार्मर यांचे राजकीय भवितव्य केवळ विरोधकांच्या हल्ल्यांवर अवलंबून नाही, तर ते त्यांच्या पक्षातील सहकाऱ्यांच्या संयमावर अवलंबून आहे. पक्षातील अविश्वास दूर केला नाही, तर २०२४ मध्ये प्रचंड आशा निर्माण करणारे हे नेतृत्व २०२६ मध्येच इतिहासजमा होऊ शकते. ब्रिटनला स्थैर्य देण्याचे वचन देणारे स्टार्मर आता स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी झगडताना दिसत आहेत आणि हेच त्यांच्या नेतृत्वाचे सर्वात मोठे शोकांत वास्तव आहे. ब्रिटनच्या राजकारणात ‘परिवर्तनाचे वारे’ वाहतील या आशेने जनतेने स्टार्मर यांच्या हाती सत्तेची धुरा सोपवली. १४ वर्षांच्या हुजूर पक्षाच्या (काँझर्व्हेटिव्ह) राजवटीनंतर मजूर पक्षाचा विजय ऐतिहासिक होता; मात्र विजयाचा हा गुलाल सुकण्यापूर्वीच स्टार्मर यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

सध्याचे चित्र पाहता, स्टार्मर हे केवळ विरोधकांशीच नाही, तर स्वतःच्या पक्षातील ‘अदृश्य शत्रूंशी’ आणि स्वतःच्याच प्रतिमेशी झुंज देत असल्याचे दिसते. मजूर पक्ष मुळातच कामगार आणि डाव्या विचारसरणीच्या पायावर उभा आहे. स्टार्मर यांनी निवडणूक जिंकण्यासाठी पक्षाला ‘मध्यममार्गी’ बनवण्याचा प्रयत्न केला. सत्तेत आल्यावर त्यांनी घेतलेले काही आर्थिक निर्णय त्यांच्याच पक्षातील कट्टर डाव्या गटाला (कोर्बिन समर्थक) रुचलेले नाहीत. हिवाळ्यातील इंधन भत्त्यात केलेली कपात हा स्टार्मर यांच्यासाठी राजकीय आत्मघात ठरताना दिसत आहे.


यामुळे लाखो ज्येष्ठ नागरिक संकटात सापडले असून पक्षाच्या अनेक खासदारांनी उघडपणे या विरोधात मतदान केले किंवा गैरहजर राहिले. ही स्टार्मर यांच्या अधिकाराला दिलेली पहिली मोठी चपराक होती. बंडखोर खासदारांवर निलंबनाची कारवाई करून स्टार्मर यांनी आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला खरा, पण यामुळे पक्षात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अंतर्गत संवाद तुटला आहे. स्टार्मर यांच्यावर सध्या सर्वात जास्त टीका होत आहे ती म्हणजे त्यांनी घेतलेल्या महागड्या भेटवस्तू आणि देणग्यांवरून. ज्या नेत्याला ‘मिस्टर क्लिन’ म्हणून ओळखले जायचे, त्यांच्यावर आता ‘क्रोनिझम’ (नातेवाइक आणि मित्रत्वाचे हितसंबंध जोपासणे) चे आरोप होत आहेत. मजूर पक्षाचे मोठे देणगीदार लॉर्ड अली यांनी स्टार्मर यांच्या पत्नीला महागडे कपडे, चष्मे आणि राहण्यासाठी निवासस्थान उपलब्ध करून दिले. हे प्रकरण बाहेर आल्यावर स्टार्मर हे श्रीमंतांच्या तालावर नाचणारे बाहुले आहेत का? असा प्रश्न विचारला जात आहे.

सुरुवातीला या देणग्यांची माहिती दडवून ठेवल्याने स्टार्मर यांची नैतिक बाजू कमकुवत झाली आहे. ब्रिटनची जनता आर्थिक टंचाईचा सामना करत असताना पंतप्रधान मात्र आलिशान जीवनशैली जगत असल्याचा नकारात्मक संदेश लोकांमध्ये गेला आहे. महत्त्वाच्या पदांवर स्टार्मर यांनी केलेल्या नियुक्त्यांवरून प्रशासकीय वर्तुळात मोठी नाराजी आहे. कॅबिनेटमधील प्रभावशाली अधिकारी सु ग्रे यांची नियुक्ती आणि त्यांच्या पगारावरून झालेला वाद यामुळे सरकारची नाचक्की झाली. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मते स्टार्मर हे अनुभवी लोकांपेक्षा आपल्या मर्जीतील लोकांना पदे देऊन ‘राजकीय इको-सिस्टीम’ तयार करत आहेत. सरकार आणि नोकरशाहीमध्ये संघर्षाची ठिणगी पडते, तेव्हा प्रशासनाची चाके मंदावतात. स्टार्मर यांना सध्या याच गतिरोधकाचा सामना करावा लागत आहे.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

चर्चा आजची

# सांस्कृतिक कला जपतेय गांव



प्रमोद जाधव

पुर्वी कला क्षेत्रावर मोठ्या शहरांची मक्तेदारी होती. मात्र ही मक्तेदारी आता हळूहळू कमी होऊ लागल्याचे चित्र दिसून येत आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कला जपण्याचे काम गावागावात होत आहे. वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रमांचा जल्लोष आज ठिकठिकाणी पहावयास मिळत आहे. कला ॲकेडमीच्या माध्यमातून धडे घेऊन आज गावातील मुले, मुली कला क्षेत्रात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करीत आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांना हक्काचे व्यासपिठ उपलब्ध होत आहे.टिव्हीवर होणारे रिॲलिटी शो सारखे कार्यक्रम गावागावात होत आहे, तो क्षण जगण्याचा आनंद ग्रामीण भागात होत आहे. त्यामुळे ही कला अधिक वृंध्दीगत करण्याचे काम ग्रामीण भागातील मंडळही करीत असल्याचे दिसून येत आहे.

उन्हाळी सुट्टी पडली आहे. आता गावागावाता वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून वेगवेगळे मनोरंजानाचे कार्यक्रम घेतले जात आहे. पडद्यावरील चित्रपट बघण्याची परंपरा कायम असताना आता सांस्कृतिक कार्यक्रमांचा क्रेझ वाढत आहे. गावातील कलाकारांना यातून व्यासपिठ मिळण्याची संधी प्राप्त होत आहे.लहान मोठ्या शहरापूरता मर्यादीत असलेला ऑर्केस्ट्रा आता ग्रामीण भागातदेखील दिसून येऊ लागला आहे. नामवंत कलाकारांमार्फत होणारा हा कार्यक्रम आता गावांमध्ये भरविला जात आहे. त्यामुळे आता टिव्हीवरील कार्यक्रमांचा आनंद गावे, वाड्यांमध्येदेखील ऑर्केस्ट्राद्वारे नागरिकांना घेता येत आहे. पुर्वी गावांमध्ये धार्मिक, सामाजिक कार्यक्रम आयोजित केल्यावर त्याठिकाणी मनोरंजन म्हणून पडद्यावर चित्रपट लावले जात होते. त्यानंतर हळुहळू बदल केला. गावांतील लहान मोठ्या कलांकरांसह हौशी मंडळींना हक्काचे व्यासपिठ मिळवून देण्याचा प्रयत्न सांस्कृतिक अर्थात गॅदरींगद्वारे करण्यात आला. गावातील मुले, मुली, मोठी मंडळी एकत्र येऊन एखादे नाटक बसवणे, एखाद्या बॉलिवुडमधील गाण्यांद्वारे नृत्यांचे सादरीकरण करणे, तसेच गावातील एखाद्या कलाकाराचा चांगला आवाज असल्यास त्यामार्फत गाण्याचे सादरीकरण करणे असे अनेक कार्यक्रम मनोरंजनासाठी चालत होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गावांतील एकोपा अधिक वृंध्दीगत होण्यास मदत होऊ लागली. वेगवेगळ्या चॅनलमार्फत होणारे गाण्यांचे, नृत्यांचे सादरीकरण लहान मोठ्या शहरांपुरता मर्यादीत होते. परंतु बदलत्या काळानुसार ग्रामीण भागातदेखील कलेबाबत प्रचंड आवड निर्माण झाली आहे. रिॲलिटी शो सारखे कार्यक्रम करण्यावर भर दिला जात आहे. गावे, वाड्यांमध्ये सुध्दा आता भव्यदिव्य असे ऑर्केस्ट्रा होऊ लागले आहेत. याचा क्रेझ गावांमध्येदेखील दिसून येत आहे. टीव्हीवरील वेगवेगळ्या चॅनलमार्फत होणाऱ्या कार्यक्रमांचा आनंद ऑर्केस्ट्रातून पहावयाची संधी गावांतील मंडळींना मिळू लागली आहे. लावणी, देशभक्तीपर गीत, इतर हिंदी, मराठी गाण्यांचे सादरीकरण, वेगवेगळ्या गाण्यांवर नृत्यांचे सादरीकरण करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले जात आहे.

कला जपण्यासाठी ग्रामीण भागात पालक मुलांना अधिक प्रोत्साहित करीत असल्याचे दिसून येत आहे. मुलांना संगीत क्लासह नृत्याचे धडे देण्याचे काम वेगवेगळ्या ॲकेडमीच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे आपल्या नृत्यांतून कलेचे सादरीकरण करत रसिकांना मंत्रमुग्ध करण्याचे काम गावांतील कलाकार आपल्या परिने करीत असल्याचे चित्र आहे. वेगवेगळ्या त्यांच्या सुमधूर आवाजाने गायलेल्या गाण्यांना प्रचंड दाद दिली जात आहे. अनेकजण वेगवेगळ्या गाण्यांवर नाचत मनोरंजनाचा आनंद मनमुरादपणे लुटण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे गावागावात हा सांस्कृतिक कार्यक्रमांचा क्रेझ वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून दिसून येत आहे. सध्या उन्हाळी सुट्टी आहे. मुंबई, पुणे येथील पर्यटक तसेच चाकरमानी सुट्टीचा आनंद घेण्यासाठी गावी आले आहेत. ती मंडळीदेखील या कार्यक्रमांचा आनंद घेऊन जल्लोष साजरा करीत असल्याचे चित्र आहे.

आजची पिढी शिक्षण घेत असताना संगीत क्षेत्राकडेदेखील वळू लागली आहे. वेगवेगळ्या नृत्य, संगीत ॲकेडमीच्या माध्यमातून धडे घेण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे लाईव्ह कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यास मुले तयार झाली आहेत. या क्षेत्राचे ज्ञान वाढले आहे. तसेच कराओकेसह सोशल मिडीयाचा आधारदेखील मुलांना मिळत आहे. त्यामुळे या क्षेत्राबाबत असलेली ग्रामीण व शहरी भागातील दरी कमी झाली असल्याचे कला प्रेमी विनायक भोनकर यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

लोकसंसद

## विवाह सोहळ्यात आता सप्तपदीची एंट्री



सध्या अधिक मासामुळे विवाह सोहळ्यांना थोडा ब्रेक मिळाला असला तरी हा महिना संपताच पुन्हा एकदा लग्न सोहळे धूमधडाक्यात पार पडतील विवाह सोहळ्यास एक धार्मिक आणि पावित्र असे अधिष्ठान आहे जसा काळ बदलला तसे लग्न सोहळे पार पाडण्याची पद्धत देखील पूर्णपणे बदलली आहे सद्या विवाह सोहळ्यात सप्तपदीची एंट्री झाली आहे काही मोजकेच लोक घेवून हा कार्यक्रम आटोपला जातो या वेळी मुहूर्ताची टायमिंग अचूक साधून वधु - वरांवर अक्षता रोपण करुन एकप्रकारे विवाह सोहळा आटोपला जातो त्यामूळे लग्न पत्रिकेतील वेळेला फारसे महत्व राहिले नसल्याचे दिसून येते आहे ग्रामीण भागात लग्नसराईत शुभ मुहूर्तासाठी धडपड केली जात असली तरी प्रत्यक्षात लग्न मंडपात मात्र त्या मुहूर्तालाचं हरताळ फासला जात आहे पत्रिकेतील वेळेनुसार सर्वजण लग्नाला हजर राहतात पण वधुवरांची इव्हेंटबाजी, डान्स, फटाक्यांची आतषबाजी यासारख्या प्रकारांमुळे विवाह सोहळे उशिरा पार पडत असून लग्नकार्यास उपस्थित असलेल्यांची गैर सोय होत आहे पहिल्या अक्षता अर्थात सप्तपदी पार पडल्यामुळे असल्या कार्यक्रमांना उधाण आले आहे पूर्वीच्या काळी ज्येष्ट मंडळी मुहूर्त सांभाळत होती आता हळद इव्हेंट, डिजे, कृत्रिम शॉवर, नाचगाण्यांच्या दिखाव्यात लग्नातील साधेपणा, मांगल्य हरवत चालले असल्याचे दिसून येते आहे !

**- राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

दिनविशेष

# विलासराव देशमुख : एक सक्षम आणि जनप्रिय मुख्यमंत्री

लातूरच्या मराठवाडा भागातील एक बलवान नेते विलासराव देशमुख हे एक राजकीय कारागीर होते, जे डेमोक्रॅटिक फ्रंट या आघाडी सरकारचे नेतृत्व करत दोनदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. दोन्ही प्रसंगी ते पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करू शकले नाहीत. देशमुख यांच्या

मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाचा काळ म्हणजे २६/११ चा मुंबई दहशतवादी हल्ला, जेव्हा त्यांच्यावर या प्रकरणाच्या ङ्गअयोग्यफ हाताळणीबद्दल टीका झाली. देशमुख यांचा जन्म २६ मे १९४५ रोजी महाराष्ट्रातील लातूर येथील बाभळगाव गावात झाला. त्यांनी पुण्यातील आयएलएस लॉ कॉलेजमधून पदवी पूर्ण केली. त्यांनी त्यांच्या गावाच्या सरपंच म्हणून राजकीय प्रवास सुरू केला आणि नंतर ते काँग्रेसच्या युवा शाखेचे सदस्य झाले. देशमुख १९८० मध्ये पहिल्यांदा लातूरमधून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले आणि १९८५ आणि १९९० मध्ये त्याच मतदारसंघातून पुन्हा निवडून आले. ते लवकरच मराठवाडा भागातील एक लोकप्रिय काँग्रेस नेते बनले आणि १९८२ ते १९९५ दरम्यान त्यांनी महसूल, कृषी, गृह, उद्योग आणि शिक्षण ही महत्त्वाची खाती सांभाळली. १९९५ मध्ये, जेव्हा ते राज्य विधानसभा निवडणुकीत पराभूत झाले, तेव्हा देशमुख यांना पक्षाच्या परिषदेत नामांकन नाकारण्यात आले. देशमुख यांनी त्यांच्या पक्षाला आव्हान दिल्यामुळे त्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून काढून टाकण्यात आले. तथापि, ते एका वर्षाच्या आत पुन्हा काँग्रेसमध्ये सामील झाले. देशमुख यांनी त्यांच्या बॉस - काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी - यांना एकदा नाही तर अनेक वेळा आव्हान दिले होते. देशमुख यांना अचानक राजीनामा देण्यास का सांगितले गेले यावर कोणत्याही काँग्रेस नेत्याने काहीही सांगितले नाही, परंतु पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी म्हणाले , ङ्गबदल आवश्यक होता.फजेव्हा देशमुख यांना अविचारीपणे राजीनामा देण्यास सांगण्यात आले तेव्हा त्यांनी कडक प्रतिकार केला. त्यांनी दावा केला की त्यांना राज्य विधानसभेतील बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा अजूनही आहे. परंतु देशमुखांचा विरोध त्यांच्यासाठी फारसा काही करू शकला नाही कारण काँग्रेसच्या हाय-कमांडने अखेर सुशीलकुमार शिंदे यांची निवड केली. देशमुख जास्त काळ मुख्यमंत्रीपदापासून दूर राहिले नाहीत. २००४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत, डेमोक्रॅटिक फ्रंट पुन्हा एकदा सत्तेत आली आणि देशमुख यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळातही २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यामुळे देशमुख त्यांचा कार्यकाळ पूर्ण करू शकले नाहीत. २६/११ च्या हत्याकांडानंतर त्यांचा मुलगा रितेश, हिंदी चित्रपट अभिनेता आणि चित्रपट निर्माते राम गोपाल वर्मा यांच्यासोबत ताज हॉटेल्समध्ये त्यांनी दिलेल्या भेटीमुळे देशभरात संतापाची लाट उसळली. भयानक

दहशतवादी हल्ल्यानंतर परिस्थिती हाताळण्याच्या पद्धतीबद्दल देशमुख यांचा काँग्रेसच्या मित्रपक्ष - राष्ट्रीय जनता दल, लोक जनशक्ती पक्ष आणि समाजवादी पक्षानेही निषेध केला. नैतिक जबाबदारी म्हणून, देशमुख यांनी अखेर ५ डिसेंबर २००८ रोजी राजीनामा दिला. राजकीय प्रकाशझोतापासून दूर जाण्याऐवजी, देशमुख यांनी संसदेत प्रवेश करण्यासाठी राज्यसभेचा मागच्या दाराने वापर केला. २०११ च्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या फेरबदलात ते अवजड उद्योग आणि सार्वजनिक उपक्रम मंत्री झाले तथापि, त्यांची राजकीय कारकीर्द फार काळ टिकली नाही. २०११ मध्ये, त्यांना सिरोसिस, यकृताचा आजार असल्याचे निदान झाले आणि ऑगस्ट २०१२ मध्ये, त्यांना यकृत आणि मूत्रपिंड निकामी झाल्याचे निदान झाले. यकृत प्रत्यारोपणाचे प्रयत्न अयशस्वी झाले आणि १४ ऑगस्ट २०१२ रोजी वयाच्या ६७ व्या वर्षी देशमुख यांचे निधन झाले.

# महामार्गावर वाहनांच्या रांगाच रांगा

## • अरुंद रस्त्यांमुळे प्रवाशांचे प्रचंड हाल, बेशिस्त चालकांमुळे कोंडीत भर

**। पाली । प्रतिनिधी ।**

शनिवारी आणि रविवारी मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास नको रे बाबा! अशी संतप्त आणि उद्विग्न प्रतिक्रिया सध्या महामार्गावरून प्रवास करणारे पर्यटक व चाकरमान्यांकडून उमटत आहे. आठवड्याच्या शेवटी म्हणजेच वीकेंडला या महामार्गावर वाहनांची संख्या प्रचंड वाढते. शनिवारी व रविवारी देखील महामार्गावरील इंदापूर आणि माणगाव शहरात वाहनांच्या २ ते ३ किलोमीटर लांब रांगा लागल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल झाले.



बेशिस्त वाहन चालकांमुळे कोंडीत आणखीन भर पडते पळस्पे ते इंदापूर दरम्यान रखडलेली कामे आणि अरुंद रस्त्यांमुळे प्रवाशांना तासनतास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. इंदापूर व माणगाव बायपासचे काम अजूनही पूर्ण होऊ शकलेले नाही. परिणामी, महामार्गावरील संपूर्ण वाहतूक अजूनही इंदापूर आणि माणगाव शहराच्या मुख्य बाजारातूनच सुरू आहे. शनिवार-रविवारी पर्यटकांच्या आणि चाकरमान्यांच्या गाड्यांची संख्या वाढताच या दोन्ही शहरांना वाहतूक कोंडीचा मोठा विळखा बसत आहे. पळस्पे ते इंदापूर या ८४ किमीच्या टप्प्यात नागोठणे, कोलेटी आणि कोलाड येथील पुलांची कामेही अजून पूर्णत्वाकडे गेलेली नाहीत. परिणामी केवळ एकाच बाजूची लेन सुरू असल्याने आणि रस्त्यांचा दर्जा निकृष्ट असल्याने वाहनांचा वेग कमालीचा मंदावतो. या महामार्गावर कर्नाळा, रामवाडी, कोलेटी आदी ठिकाणी वाहतूक कोंडीचा फटका बसतो.

बेशिस्त वाहनचालकांमुळे कोंडीत भरइंदापूर व माणगाव शहरात तसेच शहराच्या अलीकडे आणि पलीकडे महामार्गाचा रस्ता अत्यंत अरुंद आहे. अशा संवेदनशील ठिकाणी अनेक बेशिस्त वाहनचालक संयम न राखता, आपल्या ठरलेल्या लेनमध्ये न राहता लेन सोडून चुकीच्या पद्धतीने पुढे जाण्याचा प्रयत्न करतात. परिणामी, समोरून येणाऱ्या गाड्यांना जाण्यासाठी जागाच उरत नाही आणि दोन्ही बाजूची वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. वाहनचालकांच्या या बेशिस्तपणामुळे आधीच असलेल्या वाहतूक कोंडीत आणखी भीषण भर पडत आहे.

आता मे महिना संपत आला असून प्रशासनाने दिलेली 'डेडलाईन' जवळ आली आहे. जर पावसाळ्यापूर्वी हे बायपास आणि पुलांचे काम युद्धपातळीवर पूर्ण झाले नाही, तर आगामी पावसाळ्यात मुंबई-गोवा महामार्गावरील प्रवास अधिक धोकादायक आणि त्रासदायक ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### वाहतूक पोलीस तैनात

या ठिकाणी शहरात वाहतूक पोलीस तैनात असतात. मात्र, शहराच्या दोन्ही बाजूला बाहेर रस्त्यावर पोलीस नसल्यामुळे त्या ठिकाणी बेशिस्त वाहन चालक वाहने पुढे घेतात आणि परिणामी वाहतूक कोंडीत भर पडते.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२६ मे

१)श्री.पुरूषोत्तम पदु धुमाळ
पेझारी, अलिबाग
२६-०५-१९४२

२) श्री.विनोद वारलुजी खवसकर
तळनगर, अलिबाग,
२६-०५-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

**स्व. जाधवजी राणाशी काराणी, स्मरणार्थ अलिबाग**



**कै. मनोहर पुरुषोत्तम किल्लेकर, स्मरणार्थ, नागाव अलिबाग**



**डॉ यतीश महेंद्र दोशी, वाढदिवस अलिबाग**

**स्व. मंजुळाबेन करणराज जैन, स्मरणार्थ, पोयनाड, अलिबाग**

**निधी सुनील कोठेकर, लग्नदिनानिमित्त, अलिबाग**

## अनिल गोळे यांना मातृशोक

**अलिबाग :** सकल मराठा समाज सामाजिक संस्था, अलिबागचे संस्थापक सचिव तसेच जय भवानी नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक अनिल गोळे यांच्या मातोश्री मंदाकिनी मारुती गोळे यांचे



रविवारी (दि.२४) मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९३ वर्षे होते. त्यांच्या निधनाने गोळे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात वनिता आणि शिल्पा या दोन मुली, अनिल, नयनेश दोन मुले, सुना, नऊ नातवंडे व आठ पतवंडे असा मोठा परिवार आहे. यांचा दशक्रिया विधी मंगळवार, २ जून रोजी श्रीक्षेत्र उद्धर रामेश्वर येथे होणार असून, उत्तरकार्य शुक्रवार, ५ जून रोजी त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याचे गोळे कुटुंबियांकडून सांगण्यात आले आहे.

---

## रामदास ठाकूर यांचे निधन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गव्हाण-कोपर येथील गव्हाण ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच रामदास पांडुरंग ठाकूर (वय. ७९) यांचे गुरुवारी (दि. १४) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी २००३ ते २००८ दरम्यान गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच पद भूषविले होते. ते मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेज गव्हाण-कोपरचे चेअरमन भार्गव ठाकूर यांचे ते वडील होत. त्यांच्या अंत्ययात्रेत महेंद्र घरत, भाऊ पाटील, वसंत पाटील, गव्हाण-कोपर पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## स्नेहसंमेलनातून जुन्या आठवणींना उजाळा

**। कर्जत । वार्ताहर ।**

पोशीर शाळेतील १९९९-२००० दहावीच्या माजी विद्यार्थांनी एकत्र येऊन जुन्या ठेवणींना उजाळा दिला. पोशीर येथील श्रमजीवी जनता विद्या मंदिर पोशीर शाळेतील १९९९,२००० साली दहावीत शिकणारे विद्यार्थी २४ मे रोजी एकत्र आले होते. त्यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी जुन्या अडवणींना उजाळा देत अनेक माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील अनुभव सांगत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

श्रमजीवी जनता विद्या मंदिर पोशिर येथे १९९९-२००० बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे भव्य स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. तब्बल २६ वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विध्यार्थांमध्ये यावेळी, आनंद, उत्साह आणि जुन्या आठवणींना उजाळा देणारे भावनिक वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली.

## शिपूरकर शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव परिसरातील शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी सुधाकर नारायण शिपूरकर शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत केली आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये शाळेतील सहा विद्यार्थ्यांनी यश संपादन करत शाळेच्या यशाची परंपरा कायम राखली आहे. या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये सुधागर संथिरसेकरन गौडा, ओवी अजित शिंदे, काव्या चव्हाण, आदित्य पवार, भुजळ वाढवळ, यश पाटील यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, प्रामाणिक मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापनाचा आनंद द्विगुणित झाला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील योग्य मार्गदर्शन, मेहनतीच्या जोरावर मोठे यश संपादन करू शकतात, हे या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन, मुख्याध्यापिकांचे नियोजन तसेच पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले. शाळेत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग, सराव परीक्षा आणि अभ्यासाचे नियोजनबद्ध प्रशिक्षण देण्यात आले होते.

त्याचा सकारात्मक परिणाम या यशातून दिसून आला. शाळा व्यवस्थापन समिती, प्रशासकीय मंडळ, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद तसेच पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी भविष्यातही असेच उज्ज्वल यश संपादन करून शाळेचे,पालकांचे आणि गावाचे नाव उंचवावे अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



## पेट्रोल दरवाढीविरोधात पनवेलमध्ये आंदोलन




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक बजेट कोलमडत असून महागाईचा मोठा फटका नागरिकांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनातर्फे नवीन पनवेलमध्ये पेट्रोल दरवाढीविरोधात अनोखे आंदोलन करण्यात आले.

नवीन पनवेल येथील ब्रिजजवळ असलेल्या पेट्रोल पंपावर हे आंदोलन पार पडले. यावेळी मनसे कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात घोषणाबाजी करत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. आंदोलनाचे विशेष आकर्षण म्हणजे एका कार्यकर्त्याने स्वर्गातून आलेले चित्रगुप्त अशी वेशभूषा परिधान करून नागरिकांमध्ये जनजागृती केली. पेट्रोल भरण्यासाठी आलेल्या वाहन चालकांना यावेळी मेलडी चॉकलेटचे वाटप करण्यात आले. पेट्रोलचे दर वाढत असताना आता चॉकलेट खाऊनच समाधान मानावे लागेल, असा उपरोधिक संदेश कार्यकर्त्यांकडून देण्यात आला. वाहन चालकांनीही वाढत्या इंधन दरांबाबत नाराजी व्यक्त करत सरकारने दरवाढ नियंत्रणात आणावी, अशी मागणी केली. मनसेच्या या अनोख्या आंदोलनाची परिसरात मोठी चर्चा रंगली होती.



## पोलीस मित्र संघटनेतर्फे मार्गदर्शन कार्यक्रम

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यात पोलीस मित्र संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्य विभाग व रायगड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय विश्रामगृह, रोहा येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी कोकण विभाग व रायगड जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांना ओळख पत्र तसेच नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्षपदी हरिचंद्र वाजंत्री, महिला जिल्हाध्यक्षपदी सुनंदा मोहिते, उपजिल्हाध्यक्ष पदी मंगेश पालांडे तसेच महिला जिल्हाध्यक्ष पदी सुप्रिया पाशिलकर यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी जी. एम. भगत, रेवती कदम, कृष्णकांत पाटील, वर्षा सहस्त्रबुध्ये, अनिल पोटफोडे, संजय करंजे, मंदा ठाकूर, वर्षा जांबेकर तसेच रोहा तालुक्यातील सदस्य आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'वनार्टी'च्या ऑनलाईन प्रशिक्षणाची मुदतवाढ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेली वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था, ऑनागपूर (वनार्टी) राज्यातील विमुक्त जाती तसेच भटक्या जमाती ब, क, ड, नॉन-क्रिमीलेअर प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी सातत्याने उल्लेखनीय कार्य करीत आहे. गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षणासोबत विद्यावेतनाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देत वनार्टीने राज्यातील हजारो विद्यार्थ्यांच्या यशाचा मार्ग सुकर केला आहे. विद्यार्थ्यांकडून मिळालेला प्रचंड प्रतिसाद आणि हेल्पलाईनवरून आलेल्या सातत्यपूर्ण मागण्यांमुळे हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती ङ्गवनार्टीफ्चे प्र. व्यवस्थापकीय संचालक मा. प्रशांत वावगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

याच धर्तीवर २०२६-२८ या शैक्षणिक सत्रासाठी वनार्टीतर्फे जेईई, नीट आणि एमएचटी-सीईटी परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाणार आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांतील पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले असून, या उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सुरुवातीला अर्जाची अंतिम मुदत ३० मे २०२६ निश्चित करण्यात आली होती. मात्र, विद्यार्थ्यांनी वनार्टीच्या ७८८७८८२०२६ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून अर्ज प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या मोठ्या प्रतिसादाची दखल घेत आता अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील अनेक होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महाज्योतीच्या माध्यमातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांनी यापूर्वी जेईई, नीट आणि एमएचटी-सीईटी परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आता त्याच धर्तीवर वनार्टी संस्था विमुक्त जाती आणि भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी नवी आशा निर्माण करीत आहे.

---

कुटुंबियांच्या उपस्थितीत कौतुक सोहळा | सन्मान पाहून पालक गेले भारावून

## 'आम्ही आगरी ग्रुप' कडून विद्यार्थ्यांचा सन्मान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील आगरी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा 'आम्ही आगरी ग्रुप'कडून घरोघरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांसोबत त्यांचा सत्कार करण्यात आला. दहावी आणि बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून कर्जत तालुक्यातून त्या-त्या शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयात आगरी समाजात प्रथम येण्याचा बहुमान मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या घरी जाऊन सन्मान करण्यात आला.



आम्ही आगरी ग्रुपकडून गेली काही वर्षे दहावीमध्ये आपल्या शाळेत प्रथम क्रमांक मिळविला असेल अशा विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन सन्मान केला जातो. पदाधिकाऱ्यांनी थेट विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत हा कौतुक सोहळा पार पाडला. घरातल्या हक्काच्या माणसांसमोर झालेला हा सन्मान पाहून विद्यार्थी आणि त्यांचे पालक भारावून गेले होते. विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे केवळ त्यांचे नसून संपूर्ण कुटुंबाच्या कष्टाचे फळ आहे, ही भावना जपत आम्ही आगरी ग्रुपने हा अनोखा उपक्रम राबवला. आम्ही आगरी ग्रुपचे संदीप म्हसकर, अंकुश शेळके, मिलिंद विरले, शिवाजी कराळे, जनार्दन पवार, विलास डुकरे, किशोर घारे, केशव मुने, मनोहर हजारे, मनीषा दळवी, सुभाष नाईक, जयवंत हबळे, कैलास थेरं, महेश भगत, रवींद्र तरे, रामदास माळी, राज कराळे यांच्यासह समाजातील इतर मान्यवरांचा समावेश होता.

कर्जत तालुक्यात ९७ टक्के गुण मिळवून यश मिळवणाऱ्या सायली शशिकांत मुंढे हिचा धामोते गावी जाऊन सन्मान करण्यात आला. त्याचवेळी भार्गवी तरे, जय मोडक, प्रेम ऐनकर, सोनाली शेळके, वैष्णवी मुने, मनाली मुने, दिव्या लोभी, सायली मुंढे, जागृती अगीवाले, ऋषभ शेळके, स्नेहल कराळे, संजीवनी धुळे, श्रेया स्नेहा मसने या गुणवंत विद्यार्थ्यांचा दहावी आणि बारावीमध्ये प्रथम क्रमांक आल्याने विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.


---

# निवडक

## रजनी सुतार यांना देवाज्ञा



**माणगाव, :** माणगाव नगरपंचायत हद्दीतील खांदाड गावचे रहिवाशी तथा नगरपंचायतीचे कर्मचारी निलेश सुतार व राजेश सुतार यांच्या मातोश्री रजनी नथुराम सुतार यांचे गुरुवारी (दि.२१) मे रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे. रजनी सुतार ह्या प्रेमळ स्वभावाच्या शांत, मनमिळावू व्यक्तिमत्व होत्या. थोरामोठ्यापासून सर्वांना त्या आपलेसे वाटत. त्यांच्या निधनाने सुतार परिवार, खांदाड ग्रामस्थ व नातेवाईकांवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या अंत्यविधीला पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचा दशक्रिया विधी शनिवार दि.३० मे रोजी सोनभैरव मंदिर खांदाड येथे होणार असून उत्तरकार्य विधी मंगळवारी दि.२ जून रोजी राहत्या घरी खांदाड-माणगाव येथे होणार असल्याची माहिती त्यांचे निलेश सुतार यांनी दिली.



## शिरोडा केरवाडीत मच्छिमार बोट बुडाली

**वेंगुर्ला :** शिरोडा-केरवाडी येथून समुद्रात मासेमारी करण्यासाठी गेलेली बोट सोमवारी (दि.२५) मे रोजी पहाटे अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्याने बुडाली. यात केरवाडी येथील राजन राघोबा सारंग (५०) हे बेपत्ता झाले आहेत. तर होडीचे मालक प्रकाश राखोबा सारंग (५५) व त्यांचा मुलगा राघोबा उर्फ दाजी प्रकाश सारंग (२१) यांना वाचवण्यात दुसऱ्या होडीला यश आले आहे. शिरोडा केरवाडी येथून नेहमीप्रमाणे एकाच कुटुंबातील प्रकाश सारंग, त्यांचा मुलगा दाजी व त्यांचा भाऊ राजन सारंग हे मच्छिमारीसाठी समुद्रात गेले होते. यावेळी पहाटे अचानक झालेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे ही मच्छिमारी बोट बुडाली. यात प्रकाश सारंग व त्यांचा मुलगा दाजी यांनी बोटीवर असणाऱ्या ऑइल टँकरच्या साहाय्याने आपले प्राण वाचवले. यानंतर त्याठिकाणी पोचलेल्या दुसऱ्या होडीने त्यांना किनाऱ्यावर आणले. मात्र राजन सारंग हे समुद्रात बुडाले. दरम्यान राजन सारंग यांचा समुद्रात सकाळी इतर होड्यांच्या साहाय्याने शोध घेण्यात आला. मात्र दुपारी उशिरापर्यंत ते बेपत्ताच होते. दरम्यान पोलीस व महसूल प्रशासनाने घटनास्थळी पोचून पंचनामा केला. यावेळी घटनास्थळी प्रितेश राऊळ, लतिका रेडकर, चंदन हाडकी, केरवाडी येथील मच्छिमार सोसायटीचे चेअरमन काशिनाथ नार्वेकर यांनी भेट दिली.

## रानवडेत लाठी काठीने जिंकली मने

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील रानवडे येथे सकल हिंदू समाज समिती व साई मंडळांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले भव्य हिंदू संमेलन बुधवारी (दि. २०) मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. हिंदू समाजामध्ये जनजागृती, सामाजिक ऐक्य जागर निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास गजानन अधिकारी, सुजित शिंदे, पंचक्रोशीतील सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, परिसरातील ग्रामस्थ, युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व भारतमाता पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या संमेलनात धनंजय सुभाष गद्रे, ज्योती पाटील अजित मारुती शेडगे यांनी मार्गदर्शन केले. तसेच सेवा सहयोग फाऊंडेशनच्या वतीने किशोरी विकास प्रकल्पांतर्गत पारंपरिक लाठीकाठीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. चंद्रकांत अधिकारी यांनी बनाटी प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व भक्तिमय वातावरणात पार पडला. एकत्र येऊया, एकत्र राहूया, बलशाली हिंदुस्थान घडवूया हा संदेश या संमेलनातून देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद लाड यांनी केले तर प्रस्तावित दीपक गावडे यांनी केले. कार्यक्रमाचे उत्तम असे नियोजन ग्रामस्थ मंडळ रानवडे यांनी केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सकल हिंदू समाज समिती, साई मंडळ तसेच सर्व कार्यकर्त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

## क्लिनिकल शैक्षणिक सभेचे आयोजन



**कर्जत :** कर्जत मेडिकल असोसिएशनतर्फे सभासद डॉक्टरांसाठी कार्डिओ रेस्पिरेटरी रिसक्सिटेशन विषयावर नेरळ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे बुधवारी क्लिनिकल शैक्षणिक सभा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. हेमंत इंगोले होते. त्यांनी योग्य वेळी दिल्या जाणाऱ्या सीपीआरमुळे रुग्णांच्या जीवित राहण्याचे प्रमाण कसे वाढते याचे महत्त्व पटवून दिले. तसेच रुग्णांच्या जीववाचवण्यासाठी गोल्डन अवर किती महत्त्वाचा असतो यावर विशेष भर दिला. त्यांनी सीपीआरच्या आधुनिक व सुवर्णमानांकित पद्धतींचे मार्गदर्शन केले तसेच यशस्वी सीपीआरनंतर रुग्णांचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत उपस्थित डॉक्टरांना प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. या क्लिनिकला डॉ. हेमंत गांगोलिया, डॉ. आशुतोष कुलकर्णी, डॉ. श्यामसिंग पावरा, डॉ. संजय गुजर, अध्यक्ष डॉ प्रशांत गांगल, डॉ. विवेक भगत,सचिव डॉ. महेश शिरसाट, डॉ विकास गोमारे यांच्यासह अनेक डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. विकास गोमारे यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. अध्यक्ष डॉ. प्रशांत गांगल यांनी डॉ. इंगोले यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सर्व नियोजन सचिव डॉ. महेश शिरसाट यांनी पार पाडली.

## साहिलचे 'मास्टर्स इन आर्किटेक्चरल टेक्टॉनिक्स'मध्ये यश



**माणगाव :** माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील रहिवाशी गोविंद राईस मिलचे मालक संतोष मेथा यांचा भाचा साहिल मनोज गांधी याने ममास्टर्स इन आर्किटेक्चरल टेक्टॉनिक्सफ्मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमात उज्वल यश संपादन करीत साहिलने जीपीए ४ ग्रेड मिळवित शैक्षणिक उत्कृष्टतेची नोंद केली आहे. सातत्य आणि अथक परिश्रमाच्या जोरावर त्याने हे यश मिळवले आहे. त्याच्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. साहिलने वास्तुकला शाखेचे पदवी शिक्षण पुणे येथील इंदिरा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर ॲण्ड डिझाइन येथून पूर्ण केले. त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी त्याने अहमदाबाद येथील सीईपीटी विद्यापीठात प्रवेश घेतला होता. तेथे मास्टर्स इन आर्किटेक्चरल टेक्टॉनिक्स या विषयात उच्च श्रेणीसह शिक्षण पूर्ण करीत त्याने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. साहिलच्या या यशामुळे कुटुंबीय,मित्रपरिवार आणि गोरेगाव विभागासह माणगाव तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# निवडक

## मुरूड–बोरीवली रातराणी एसटी सेवा सुरू

**आगरदांडा :** मुरूड तालुक्यातील प्रवाशांच्या सुविधेसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, मुरूड आगारातून मुरूड–बोरीवली रातराणी एसटी सेवा सुरू करण्यात आली आहे. प्रवाशांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आलेल्या या नव्या बससेवेचे स्वागत नागरिकांकडून करण्यात येत आहे. मुरूड आगारातून रात्रीच्या वेळी



मुरूड–बोरीवली एसटी सेवा सुरू करावी, अशी मागणी अरविंद गायकर यांनी महिनाभरापूर्वी राज्य परिवहन मंडळाच्या रायगड विभागीय नियंत्रक तसेच मुरूड आगार व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली होती. या निवेदनाची दखल घेत रायगड विभागीय नियंत्रक सुहास चौरे यांनी मुरूड आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांना मुरूड–बोरीवली रातराणी सेवा सुरू करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने काल रात्री सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांच्या हस्ते एसटी बसला पुष्पहार अर्पण करून या नव्या रातराणी सेवेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी राहुल शिंदे, सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर, कुणाल सतविडकर, चालक वसंत शिंदे, वाहक फिरोज शेख, शैलेश वारेकर तसेच उल्हास मकू उपस्थित होते.



## नेरळ येथे विराट हिंदू संमेलन

**नेरळ :** नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील चौकात विराट हिंदू संमेलन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विराट हिंदू संमेलनात राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी विविध विषयांवर भाष्य केले. यावेळी त्यांनी हिंदू समाजाने संघटित होण्याची गरज व्यक्त करत नेरळ परिसरातील अतिक्रमण, धर्मांतर, लव्ह जिहाद आणि अनधिकृत बांधकामांबाबत भूमिका मांडली. संमेलनात बोलताना नितेश राणे यांनी नेरळ परिसरात वाढणाऱ्या अतिक्रमणांबाबत चिंता व्यक्त केली. तसेच अनधिकृत मशिदींवर कारवाई करण्याची मागणी करत पोलीस प्रशासनालाही इशारा दिला. त्यांच्या भाषणातील काही वक्तव्यांमुळे सभास्थळी मोठी चर्चा रंगली. या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोकण सहकार्यवाह ॲड. अविनाश मोरे, आयुर्वेद अभ्यासक डॉ. वर्षा जोशी, समितीचे अध्यक्ष कुमार जाधव यांचीही प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचे स्वागत मंगेश म्हसकर, नरेश मसणे, नरेश कराळे आणि सचिव ॲड. अमोल सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. ॲड. अमोल सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात नेरळ परिसरातील विविध सामाजिक प्रश्नांवर भाष्य केले. तर, ॲड. अविनाश मोरे यांनी हिंदूंनी राष्ट्र प्रथम या भावनेतून एकत्र येण्याचे आवाहन केले.




## वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

**नवी मुंबई:** नवी मुंबई शिवसेना उपजिल्हा प्रमुख तथा तुर्भे विभागाचे नगरसेवक सुरेश कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दि. २४ मे रोजी पार पडलेल्या या शिबिरात तब्बल १०२ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले. नवी मुंबई महानगरपालिका सार्वजनिक रुग्णालयात जाणवत असलेल्या रक्ताच्या तुटवड्याची दखल घेत तुर्भे शिवसेना शाखा क्रमांक १ येथे या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबई महानगरपालिका सार्वजनिक रुग्णालय आणि महेश कुलकर्णी मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. रक्तदान शिबिरासोबतच नागरिकांसाठी मोफत नेत्रतपासणी आणि मोफत चष्मावाटप कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. तुर्भे स्टोअर परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. यावेळी दयावान चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने नगरसेवक सुरेश कुलकर्णी यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. समाजसेवक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

## फायर ब्रिगेडचा नंबर ‘नॉट रीचेबल’

**पनवेल :** पनवेलमधील दाटीवाटीच्या कापड बाजार परिसरात जैन मंदिरासमोरील ‘जलाराम सावित्री’ इमारतीच्या मीटर रूमला सोमवारी पहाटेच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. वायरिंगच्या माध्यमातून आग वरच्या मजल्यांपर्यंत पसरण्याची शक्यता निर्माण झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, शिवसैनिक ॲड. स्वप्निल उपाध्ये यांच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली. आग लागल्यानंतर ॲड. उपाध्ये यांनी तातडीने महापालिकेच्या वेबसाईटवर आणि अग्निशमन दलाच्या वाहनांवर नमूद असलेल्या ०२२–२७४६१५०० या क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, हा क्रमांक कार्यरत नसल्याचे समोर आले. आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन विभागाचा संपर्क क्रमांक बंद असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. यानंतर ॲड. उपाध्ये यांनी शिवसेना नगरसेवक तथा महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्याशी संपर्क साधला. ॲड. सोमण यांनी तातडीने नवीन पनवेल सिडको फायर विभागाशी संपर्क साधून पनवेल शहरातील अग्निशमन दलाला घटनास्थळी रवाना केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत आग आटोक्यात आणली. या घटनेनंतर ॲड. प्रथमेश सोमण यांनी सकाळीच फायर ब्रिगेड स्टेशनला भेट देत प्रशासनाला धारेवर धरले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९ वेळ : सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत
- jai santoshi maa CNG Alibag wadgav 1) Filler-man 2) Housekeeping Contact No. Shubham Naik - 7774039128, Rohit Pongade - 7498131812
- JOB VACANCY अलिबागमध्ये कामाला कार ड्रायव्हर हवा आहे. अधिक माहितीसाठी संपर्क करा. ८८०६१८४३०२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रोहा–अष्टमी रेल्वे उड्डाणपुलाचे काम संथगतीने

## ■ प्रवाशांचे हाल; नागरिकांमधून संताप व्यक्त



। चणेरा । प्रतिनिधी

रोहा–अष्टमी रेल्वे क्रॉसिंगवरील बहुचर्चित रेल्वे उड्डाणपूलाचे काम तब्बल तीन वर्षांपासून संथ गतीने सुरू असल्याने नागरिक आणि प्रवाशांचा संताप दिवसेंदिवस वाढत आहे. खराब रस्ता, उडणारी धूळ, खड्ड्यांचे साम्राज्य आणि वाहतुकीची कोंडी यामुळे या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे नागरिकांसाठी रोजची डोकेदुखी ठरत आहे. आता पावसाळा तोंडावर आल्याने या रस्त्याची अवस्था आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त होत आहे.

रोहा–नागोठणे मार्गावरील अष्टमी रेल्वे क्रॉसिंग येथे सतत रेल्वे फेऱ्या वाढल्याने गेट वारंवार बंद राहत होते. त्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, नागरिकांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागत होते. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून जानेवारी २०२३ मध्ये खा. सुनील तटकरे यांच्या प्रयत्नातून सुमारे ६५ कोटी रुपयांचा रेल्वे उड्डाणपूल मंजूर करण्यात आला. रेल्वे आणि राज्य सरकार यांनी प्रत्येकी ५० टक्के निधी देण्याची तरतूद करण्यात आली होती. उद्घाटनावेळी हे काम एका वर्षात पूर्ण होईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, तीन वर्षे उलटूनही पुलाचे काम अपूर्णच आहे.

सुरुवातीला हे काम ‘मदिना इन्फ्रा’ या ठेकेदार कंपनीकडे होते. मात्र, त्यांनी काम अर्धवट सोडल्याची चर्चा आहे. त्यानंतर ‘मदानी इन्फ्रा’ या कंपनीने काम हाती घेतले. जवळपास दोन वर्षे काम सुरू राहिले; पण ही कंपनीदेखील अचानक गायब झाली. आता ‘व्हीएसआर’ कंपनीकडे कामाची जबाबदारी देण्यात आली असून, काम सुरू असले तरी गती अत्यंत मंद असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, पुलाच्या कामामुळे या परिसरातील रस्त्यांची पूर्णपणे वाट लागली आहे. मोठमोठे खड्डे, चिखल आणि धोकादायक वळणे यामुळे वाहनचालकांचे हाल होत आहेत. गेल्या पावसाळ्यात या ठिकाणी अनेक अपघात झाले होते. काहींना आपला जीवही गमवावा लागला होता. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यापूर्वी किमान रस्त्याची डागडुजी तरी करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

एका वर्षात पूर्ण होणारे काम तीन वर्षे सुरूच आहे. ठेकेदार बदलतात, पण काम पूर्ण होत नाही, नेमकं सुरू काय आहे? असा सवाल आता नागरिक उघडपणे विचारू लागले आहेत. खा. सुनील तटकरे यांनी निधी आणून मोठी घोषणा केली खरी; मात्र काम वेळेत पूर्ण करण्यात यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

सध्याची राजकीय परिस्थिती, बदलणारे ठेकेदार आणि प्रशासनाचा ढिसाळ कारभार पाहता हा उड्डाणपूल नेमका कधी पूर्ण होणार, याबाबत नागरिकांमध्ये प्रचंड संभ्रम आणि नाराजी आहे. संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा विचार करून तातडीने रस्त्याची दुरुस्ती व पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# गंजलेले विजेचे खांब जीवावर बेतणार?

## ● महावितरणच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षाविरोधात ग्रामस्थ संतप्त


● (छायाचित्र : धम्मशील सावंत)

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

बेणसे येथील सिद्धार्थ नगर परिसरात उभे असलेले विद्युत खांब सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, प्रवेशद्वारा जवळील व समीर अडसुळे यांच्या घराजवळील खांब गंजून पूर्णपणे जर्जर झालेला आहे. या पोलमुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या विद्युत खांबांचा तळभाग पूर्णपणे पोखरला गेला असून, काही खांब एका बाजूला झुकलेल्या अवस्थेत दिसत आहेत. त्यामुळे कोणत्याही क्षणी हा पोल कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

याबाबत स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या समस्येबाबत अनेक वेळा महावितरण विभागाकडे तक्रारी करूनही अधिकाऱ्यांकडून केवळ आश्वासने देण्यात आली; मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. ‘‘अपघात झाल्यानंतरच प्रशासन खडबडून जागे होणार का?’’ असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

बेणसे मोहल्ला येथील आशिफ मोमीन यांच्या घराजवळील पोल देखील धोकादायक स्थितीत आहे. त्याकडे ही दुर्लक्ष केले जातं आहे. सिद्धार्थ नगर परिसरात लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला मोठ्या प्रमाणात वावरत असतात. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गंजलेल्या खांबांची स्थिती अधिकच धोकादायक बनली असून, जोरदार वारा किंवा पावसामुळे पोल कोसळल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विजेच्या तारा तुटून विद्युत प्रवाहाचा धोका निर्माण झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.

ग्रामस्थांनी आरोप केला की, विजवीतरण विभागाकडून या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. नागरिकांच्या सुरक्षेपेक्षा प्रशासनाला कागदी कारभार महत्त्वाचा वाटत असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली. ‘‘एखाद्याचा जीव गेल्यानंतरच अधिकारी जबाबदारी स्वीकारणार का?’’ असा संतप्त प्रश्न उपस्थित करत नागरिकांनी नवीन पोल बसवण्याची मागणी केली आहे.



# ‘जय श्रीराम’च्या घोषणांनी तालुका दणाणला

। उरण । प्रतिनिधी ।

सकल हिंदू समाज, उरण तालुकाच्या वतीने रविवारी आयोजित करण्यात आलेल्या ‘हिंदू विराट संमेलनाला’ हजारो हिंदू बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पेन्शन पार्कजवळील उरण नगरपालिका शाळेच्या मैदानावर पार पडलेल्या या संमेलनामुळे उरण शहर भगवामय झाले होते.

‘जय श्रीराम’, ‘जय शिवराय’ आणि ‘हर हर महादेव’च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. शहरातून काढण्यात आलेल्या शोभायात्रेत युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. भगवे झेंडे, ढोल–ताशांचा गजर आणि फुलांची उधळण यामुळे वातावरण उत्साहपूर्ण झाले होते.

संमेलनासाठी उभारण्यात आलेल्या व्यासपीठावर भारतमाता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा आकर्षणाचे केंद्र ठरल्या. यावेळी मान्यवर वक्त्यांनी हिंदू संस्कृती, राष्ट्रनिष्ठा आणि समाज एकतेवर मार्गदर्शन केले.


● (छायाचित्र : संजय गायकवाड)

# कर्जत-पनवेल जुना डीपी रोड पूर्ण करा

## ■ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे साखळी उपोषण

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत–पनवेल जुना १५ मीटर (५० फूट) डीपी रोडचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करून नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येतून दिलासा द्यावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने कर्जतमध्ये साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे.

कर्जत शहरातील टिळक चौक येथे सोमवार, दि. २५ मे रोजी सुरू झालेल्या या उपोषणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कर्जत शहराध्यक्ष ॲड. भाऊसाहेब मोरे, शहर उपाध्यक्ष राम देशमुख आणि शहर सचिव दिलीप बुंधाटे सहभागी झाले आहेत.

कर्जत चारफाटा परिसरात वाढत्या वाहतूक कोंडीमुळे सामान्य नागरिक, दररोज कर्जत–पनवेल मार्गावर प्रवास करणारे प्रवासी तसेच मुंबईकडे वाहनाने ये–जा करणारे नागरिक त्रस्त झाले आहेत. मंजूर असलेला १५ मीटर (५० फूट) डीपी रोड अद्याप पूर्णत्वास न गेल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

यासंदर्भात मुख्यमंत्री कार्यालयासह विविध शासकीय यंत्रणांकडे ३१ जानेवारी २०२६ पासून ते १२ मे २०२६ पर्यंत सातत्याने पत्रव्यवहार करण्यात आला. मात्र, नगरपरिषदेकडून केवळ ‘पुन्हा ठराव घेतो’ अशी उत्तरे देण्यात आली. अनेक वेळा पाठपुरावा करूनही रस्त्याचे काम पूर्ण होत नसल्याने लोकशाही मार्गाने आणि सनदशीर पद्धतीने साखळी उपोषण सुरू केल्याचे ॲड. भाऊसाहेब मोरे यांनी सांगितले.

# महिसदरा नदीपात्राजवळ कचऱ्याचे साम्राज्य

## नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर



। कोलाड । प्रतिनिधी ।

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरून गोवे गावाकडे जाणाऱ्या मार्गावरील पुई येथील महिसदरा नदीच्या पुलाजवळ मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. पुई ग्रामपंचायत हद्दीतील हा कचरा बेशिस्तपणे टाकण्यात येत असल्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून, नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

गोवे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत दिवसेंदिवस लोकवस्ती वाढत आहे. या परिसरात स्थानिक ग्रामस्थांसह कॉलेज विद्यार्थी आणि भाडेकरूंची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने हा कचरा महिसदरा नदीच्या पुलाजवळ, भोई समाज मंदिराच्या बाजूला टाकला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या मार्गावरून दररोज शाळा व कॉलेजचे विद्यार्थी, कामगार तसेच कोलाड बाजारपेठेत ये–जा करणारे असंख्य नागरिक प्रवास करीत असतात. मात्र परिसरात साचलेल्या कचऱ्यामुळे आणि असह्य दुर्गंधीमुळे नागरिकांना नाक मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

पावसाळा तोंडावर आला असून काही दिवसांत महिसदरा नदी दुथडी भरून वाहण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पुलाजवळ टाकण्यात आलेला कचरा नदीपात्रात वाहून जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. महिसदरा नदीचे पाणी गोवे, मुठवली आणि बाहे येथील ग्रामस्थ पिण्यासाठी वापरत असल्याने पाणी दूषित होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

दूषित पाण्यामुळे विषमज्वर (टायफॉईड), गॅस्ट्रो, कावीळ, डेंग्यू, मलेरिया, श्वसनविकार, त्वचारोग, पटकी आणि हिवताप यांसारख्या गंभीर आजारांचा फैलाव होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## गाडीची धडक बसून एकाचा मृत्यू

**पनवेल :** तालुक्यातील सोमटणे कोन–सावळा रोड येथील नवकार कार्पोरेशन लि. या ठिकाणी कलमार गाडीवरील चालक गाडी मागे घेत असताना त्या गाडीखाली एक इसम सापडून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. चालक काशिलिंग अर्जुन (४७) हा त्याच्या ताब्यातील गाडी निष्काळजीपणे पाठीमागे घेऊन राजेंद्र जाधव (५४) यास धडक दिली. गंभीररित्या जखमी झाल्याने त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

# आदिवासी बांधवाच्या उपचारासाठी मदतीचा हात



। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील जांबरुंग ठाकूरवाडी येथील आदिवासी बांधव देवराम दामू हिंदोला यांच्या पायाला गंभीर आजार झाल्याने त्यांच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. मात्र, आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने उपचार करणे कुटुंबाच्या आवाक्याबाहेर गेले होते. वेळेत उपचार न झाल्यास त्यांना डावा पाय गमवावा लागण्याची शक्यता निर्माण झाली होती.

यावेळी जांबरुंग ठाकूरवाडी येथील रायगड जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक विठ्ठल देशमुख यांनी पुढाकार घेत सामाजिक स्तरावर मदतीसाठी प्रयत्न सुरू केले. त्यांनी ट्रॉय अँड ज्यूस फाउंडेशनचे ट्रस्टी विक्रम त्रिवेदी आणि भावना त्रिवेदी यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेत विक्रम त्रिवेदी आणि भावना त्रिवेदी यांनी तात्काळ ४४ हजार रुपयांची आर्थिक मदत देत सामाजिक बांधिलकी जपली. या मदतीमुळे देवराम हिंदोला यांच्यावर आवश्यक उपचार आणि शस्त्रक्रिया करण्यात आली. पद्मावती हॉस्पिटलच्या डॉ. सीमा मॅडम तसेच खोपोलीतील डॉ. परांजपे यांनी दीड तास अथक प्रयत्न करत यशस्वी शस्त्रक्रिया केली. त्यामुळे देवराम हिंदोला यांचा डावा पाय वाचवण्यात डॉक्टरांना यश आले. या घटनेमुळे आदिवासी बांधव आणि कुटुंबियांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

राज्यस्तरीय कविसंमेलन उत्साहात | राज्यभरातील साहित्यिकांची उपस्थिती

# ‘उफान’, ‘आपडी थापडी’ कवितासंग्रहांचे प्रकाशन




। श्रीगाव । प्रतिनिधी ।

सर्जनशील पब्लिकेशन, नवी मुंबई आणि भारत परिवर्तन फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कवी अंकुश माला डिगांबर चौरपगार लिखित ‘उफान’ तसेच कवयित्री अश्विनी अतकरे लिखित ‘आपडी थापडी’ या कवितासंग्रहांचा प्रकाशन सोहळा आणि राज्यस्तरीय निमंत्रितांचे कवी संमेलन नवीन पनवेल येथील कर्नाटक हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रतिभा सराफ या होत्या. ज्येष्ठ कामगार नेते, साहित्यिक आणि विचारवंत अविनाश दोंड यांच्या हस्ते कवितासंग्रहांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी आंबेडकरी साहित्य, अभिनय आणि दिग्दर्शन क्षेत्रातील मान्यवर चरण जाधव तसेच युवा गझलकार व सर्जनशील शब्दवेल साहित्य संघाचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्याख्याता मोनिका काळे आणि अमोल चरडे यांनी केले. यानिमित्त आयोजित राज्यस्तरीय कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक दीपाली घाडगे होत्या. राज्यभरातील विविध कवी–कवयित्रींनी सामाजिक, विद्रोही, प्रेम, मानवता आणि परिवर्तनवादी विचारांवर आधारित कविता सादर केल्या. उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात कवींना उत्स्फूर्त दाद दिली.

‘उफान’ या कवितासंग्रहातील सामाजिक जाणीव आणि विद्रोही आशय, तसेच ‘आपडी थापडी’ या बालसाहित्यप्रधान कवितासंग्रहातील निरागस भावविश्व यांचे मान्यवरांनी विशेष कौतुक केले. नवोदित लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सर्जनशील पब्लिकेशन करीत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संयोजन कवी रामदास गायधने, माधवी मोतलिंग आणि कवी विलास पुंडले यांनी केले होते. सर्जनशील पब्लिकेशनचे प्रकाशक देवेंद्र इंगळेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रवीण बोपुलकर यांनी आभार प्रदर्शन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास साहित्यिक, कवी, सामाजिक कार्यकर्ते आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन व घर मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक (१) आर्यन प्रवीण नार्वेकर, (२) प्रतिमा प्रवीण नार्वेकर यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**:: मिळकतीचे वर्णन ::**

| मौजे | भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) | भुधारणा पद्धत |
|---|---|---|---|---|
| नागाव | २९१/२ | ०-२१-३०<br>०-०१-००<br>०-२२-३० | ५.०७/- | वर्ग-१ |

सदर मिळकतीपैकी (१) आर्यन प्रवीण नार्वेकर, (२) प्रतिमा प्रवीण नार्वेकर यांचे मालकीची ०-१०-५० हे. आर. क्षेत्रफळ असलेली जमीन व त्यावरील ग्रामपंचायत नागाव मालमत्ता क्रमांक २४२८, २७०२ या दोन घर मिळकती, ज्याच्या चतु:सिमा पुढीलप्रमाणे,

पुर्वेस : ग्रामपचायंत रस्ता
पश्चिमेस : रघुनाथ राऊत यांची मिळकत
दक्षिणेस : भुमापन क्रमांक २०२२
उत्तरेस : भुमापन क्रमांक २९१/२ पैकी उर्वरीत मिळकत

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतींत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु.करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २६/०५/२०२६

सही /-
**ॲड. अनिकेत एच. गुरव**
पत्ता : श्रीबाग नं. २, अलिबाग,
जि. रायगड ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी,
शिवाजी चौक, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल १) श्री. प्रणय रामनाथ भेंडे, २) चिराग रामनाथ भेंडे दोघेही रा. घर नं. ६४१, जुई गाव, हनुमान मंदिर जवळ, पोस्ट- कामोठे, पनवेल - ४१०२०६ यांनी खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे खालील नमुद विद्यमान मालक यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे भातगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**

| जमीन मालक | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मकरंद चंद्रकांत मेटकर | ३८/७ | एकुण क्षेत्र ०.०७.३० हे.आर.पॉ. | ०.८० |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

तारीख :- २६/०५/२०२६

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को. ऑप. हौसिंग सोसायटी
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे डावाले, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १६७, एकुण क्षेत्र ०-३७-०० हे. आर., आकार २.२८ रू. पैसे, ही जमीन मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक सत्यप्रकाश अयोध्याप्रसाद पांडे यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २५/०५/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीनमिळकती संदर्भित जमीनमिळकतींच्या विद्यमान मालकांकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान जमीनमालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकती या पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतींमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतींचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**: संदर्भित जमीनमिळकतींचे परिशिष्ट :**

| अ. क्र. | मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | जमीनमालक |
|---|---|---|---|---|---|
| १) | तळवली तर्फे खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड. | १३० | ०-२८-३० | ६.२५ | श्री.कृष्णा राघो वर्तक |
| २) | तळवली तर्फे खंडाळे, ता.अलिबाग, जि.रायगड. | १३५/२ | १-३५-५० पैकी ०-१९-५० | १९.२० | श्री.कृष्णा राघो वर्तक |
| ३) | तळवली तर्फे खंडाळे, ता.अलिबाग, जि.रायगड. | १६१ | ०-५६-१० | ११.७५ | श्री.विलास हरिश्चंद्र कावजी, वगैरे २. |

सदरील नोटिशीमध्ये नमूद केलेल्या खरेदीक्षेत्रामध्ये काही बदल झाल्यास सदरील नोटीस ही त्याच अंतिम खरेदीक्षेत्राबाबत आहे असे समजण्यात येईल व त्याबाबतच्या कोणत्याही कारणाने सदरील नोटीस बाधीत होणार नाही.

अलिबाग,
दिनांक : २६/०५/२०२६.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन - २, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड,
मो. ९८२२५२८९३१
ईमेल - adv.rdpatil@gmail.com.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
रायगड विभाग, पेण.

## निविदा सुचना क्रमांक ०३ सन २०२६-२७

**विभागीय अभियंता म.रा.मा.प.महामंडळ रायगड विभाग पेण हे शासकीय नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मोहोरबंद निविदा मागवित आहेत. सदरील स्थापत्य कामांचा खुलासेवार तपशील व निविदा सूचना कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.**

**निविदा सादर करताना पुढील कागद पत्रे आवश्यक आहेत.: १. आयकर प्रमाणपत्र २. सॉल्व्हंसी नोंदणी प्रमाणपत्र ३. पॅन कार्ड ४. मागील किमांन तीन वर्षामध्ये केलेल्या कामाचें कार्यादेश व कामपूर्णत्वाचा दाखला / अनुभवाचे दाखले ५. आवश्यक यंत्र सामग्री तपशिल व मशिनरी बाबतचे दाखले ६. जी.एस.टी. नोंदणी दाखला.**

**कामांचा तपशिल खालील प्रमाणे :**

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम जी.एस.टी विरहीत | कामाची अनामत रक्कम १ टक्केप्रमाणे | सुरक्षाठेवीची रक्कम ४ टक्केप्रमाणे | को-या निविदा संचाची रक्कम जीएसटीसह |
|---|---|---|---|---|---|
| १ | रा.प रायगड विभागातील विभागीय कार्यशाळेतील वॅली गटार व मेन्टन्स रॅम्पचे बांधकाम करणे | ८,३७८४६.०० | ८३७९.०० | ३३५१४.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| २ | रा.प रायगड विभागातील मुरुड डेपो वरील चालक/ वाहक विश्रांतीगृहावर पत्र्याची शेड बांधणे व पायवाटे करीता पेवींग ब्लॉक बसविणे | ८,३१,९८९.०० | ८३२०.०० | ३३२८०.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |

**क) कोरे निविदा संच मिळण्याचा कालावधीः-**
**कोरी निविदा पत्रिका देण्याची तारिख - दि.२६.०५.२०२६ ते ०४.०६.२०२६ पर्यंत सुटया सोडून सोमवार ते शुक्रवार दुपारी १४.०० वा पर्यंत व शनिवार दु.१२.०० वाजेपर्यंत**

**निविदा सादर शेवट ची तारीख- दि. ०४.०६.२०२६ वेळ -१५:०० वा. पर्यंत**
**निविदा पत्रिका उघडण्याची तारीख - दि. ०४.०६.२०२६ वेळ -१६:०० वा. पर्यंत (शक्य असल्यास)**
**कामपुर्ण करण्याची मुदत- १ ते २ कामाकरीता ६० दिवस**

**टीप :-१. कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महामंडळाने आपल्याकडे राखुन ठेवला आहे.**

**क्र.राप/राय/विनि/विअ/निविदा/**
**विभाग नियंत्रक यांचे कार्यालय**
**रा.प रायगड विभाग पेण**

**विभागिय अभियंता**
**राज्य परिवहन रायगड विभाग, पेण**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री. अविनाश किसन भागवत रा. अंधेरी पूर्व, चकाला एमआयडीसी, मुंबई ४०००९३ यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - जामरूंग, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. नारायण गणपत मोरे | ५९ | ७ | १.२५.०० पैकी लिहून देणार यांचे हिश्श्याचे क्षेत्र ०.२०.०० | ०.१५ |

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २६/०५/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. ५०४, गजवक्र रेसिडेन्सी, पाचवा मजला,
कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## जाहिरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

मनोहर लहू खैरे,
रा.कोंढवी, ता.पेण,जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत पाबळ, — सामनेवाला
ता.पेण,जि.रायगड

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील लहू सखाराम खैरे यांचा मृत्यू दिनांक २४/०९/१९८५ रोजी मौजे कोंढवी, ता.पेण, जि.रायगड येथे झाला असून त्याच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत पाबळ, ता.पेण, जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने मृत्यू नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या वडीलांच्या मृत्युची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही काही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे. कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा मृत्युनोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.


आज रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- पेण
दि. २६/०५/२०२६

सही /-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी जिल्हा व तुकडी रायगड, तालुका व पोटतुकडी - पेण यांच्या हद्दीतील व कार्यक्षेत्रातील मौजे शितोळे, ता. पेण येथील १) गट/हिस्सा क्र.५/अ/१, एकूण क्षेत्र २-४४-५० (हे. आर.), पैकी २-१९-०० (हे. आर.), २) गट/हिस्सा क्र. ५/अ/२, एकूण क्षेत्र २-१२-०० (हे.आर.), ३) गट/हिस्सा क्र. ५/अ/३, एकूण क्षेत्र २-१२-०० (हे. आर) ४) गट/हिस्सा क्र. ५/अ/४, एकूण क्षेत्र २-१२-०० (हे.आर.), ह्या मिळकती. या मिळकतीचे कायमस्वरूपी संपूर्ण मालकी हक्काने खरेदी करण्याचे योजले आहे.

वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही हिस्स्यावर अथवा भागा-वर इतर कोणाचाही प्रकारचा मालकी हक्क अथवा इतर कोणताही कायदेशीर हितसंबंध नाही. तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही तारण, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, मृत्युपत्र, दान, जप्ती, सावकार, दावा, मालकीहक्क, बोजा, जाणे येण्याचा मार्ग, वहिवाट वगैरे नाही. तसा कोणाचाही कोणताही हक्क अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या कायदेशीर कागदपत्रांच्या पुराव्यासह ही नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणाऱ्या यांच्याकडे पुराव्यासह आपली हरकत नोंदवावी. सदर मुदतीमध्ये कोणाचीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास वरील वर्णन केलेल्या मिळकती ह्या निर्वेध व बिनजोखमीची आहे असे समजून आमचे अशिल या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलावर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २६/०५/२०२६

सही /-
**Mrs. Rekha Kiran Wagh**
Advocate & Notary
B-103. Cliff haven C.H.S..
Near SBI Alibag Branch
Mob. No. 9850811391

## भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत

### शुद्धीपत्र

मौजे-पनवेल, ता.पनवेल, लोकमान्य बाळगंगाधर टिळकमार्ग (जयभारत नाका- अन्नपुर्णा ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक) रस्ता रुंदीकरण करणेकामी भुसंपादन कायदा भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९ अन्वये अधिसूचना दिनांक २५/११/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेली आहे. सदर अधिसूचनेमध्ये न.भू.क्र. ५०२ संपादित क्षेत्र १८७.३० चौ.मी. असे नमूद केले आहे.

त्याऐवजी

न. भू. क्र. ५०२ संपादीत क्षेत्र ४५.२५ चौ. मी. असे वाचण्यात यावे.

सही/-
**(पवन चांडक)**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उप विभाग पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे बोरीस, तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील निम्नलिखीत वर्णनाच्या जमिन मिळकतीमधील ०.०४.६० हे. आर क्षेत्राची जमिन मिळकत ही श्री. प्रकाश गोपाळ घरत, रा.नवेदर नवगांव, ता.अलिबाग जि. रायगड यांचे खुद्द मालकीची आहे. सदर जमिन मिळकत ही माझे अशिल यांनी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा विक्री व्यवहाराचा साठेकरार विद्यमान मालक व माझे अशिलांमध्ये स्वाक्षरीत झालेला आहे. सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही, कसल्याही तऱ्हेचे कायदेशीर हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती बाबत साठेकरार, बयाणापावती, तारण, गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, अगर कोणत्याही मार्गाने गुंतविलेली असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर अथवा रजिस्टर्ड पोस्टाने किंवा प्रत्यक्ष भेटून कळवाव्यात. जर वरील मुदतीत कुणाचीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर जमिन मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून मागाहून आलेल्या हरकती जाणीवपूर्वक सोडून दिलेल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल सदरहू जमिन मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. यांची नोंद घ्यावी. हे कळावे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बोरीस ता.अलिबाग जि.रायगड | ३/१ | ०.३५.२०<br>पो.ख.०.०४.३०<br>एकूण क्षेत्र ०.३९.५०<br>यामधील ०.०४.६० हे.आर क्षेत्र | ६.७० |

(उक्त वर्णनाच्या जमिन मिळकतीमधील श्री. प्रकाश गोपाळ घरत यांच्या मालकी हिश्याचे क्षेत्र ०.०४.६० हे. आर, आकार रू. ०.८८ पैसे हे या जाहीर नोटीसचा विषय आहे.)

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २५/०५/२०२६

**डॉ. ॲड. निहा अनिस राऊत**
लब्बैक, इस्त्रायल आळी
सन्मान हॉटेल समोर अलिबाग
मो.नं. ९८२२०६८५२६


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E–TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No :- EE/EHV (O &M) / DIVN/MHD/Tech/ E-Tender-13/2026-27 Dtd.26.05.2026 RFx No.- 7000040064** | **Sub:-** Invitation for SRM E-Tender for providing Closing and Tripping Coil for various makes of CB at 220 kV Kandalgaon Ss,220 kV Vilebhagad Ss,100 kV Roha and 100 kV Mhasala Substation under EHV (O&M) Division Mahad. | **Rs. 4,85,496/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST. Bid submission is from **26.05.2026 @ 00:00 hrs to 09.06.2026 @ 23:59 Hrs** for above tender. For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.8793505100

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn, Mahad**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकरणी रू.पै. |
|---|---|---|
| ३३/२/अ | एकूण क्षेत्र २-५२-०० हे.आर या पैकी मैत्री इंटरप्राईझेस याचे मालकीचे खाते क्र.७९३ ज्याचे क्षेत्र ०-४०-०० हे.आर.या जमीन मिळकतीबाबत | ०.२७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- २६/०५/२०२६

सही/-
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक पुरुषोत्तम वासुदेव वार्डे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/ विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- येलवणे, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ३, एकूण क्षेत्र ००-०६-६० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. १.८१ आणि भूमापन क्रमांक व उपविभाग ४/१, एकूण क्षेत्र ००-०८-०० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ०.१२/-

ठिकाण: अलिबाग
दिनांक : २६/०५/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public at large that my Clients have entered into an negotiations with the Owner being Forum Kapoor of the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property") and further is proposing to purchase said Property from her, as mentioned in First Schedule hereunder written and therefore, on instructions, I am issuing this public notice :-

All person(s), claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, succession, bequest, easement, order/ decree/judgment of court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned at the within mentioned address and within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the said Property)**

All that piece and parcel of the agricultural land bearing Gat Kramank / Upavibhag 80/2 admeasuring 0.77.00 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab / Fallow Land admeasuring 0.31.00 Akak H.R. Sq. Mtrs.), Assessing at Rs. 0.37 Ps. being, lying and situate at Dande Tarfe Nangaon, Taluka Murud and District Raigad.

**Adv. S. Y. Bartake**
**Adv. S. S. Bartake**
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag, Taluka Alibag, District Raigad, 402 201.

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public at large that my Clients have entered into an negotiations with the Owner being Forum Kapoor of the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property") and further is proposing to purchase said Property from her, as mentioned in First Schedule hereunder written and therefore, on instructions, I am issuing this public notice :-

All person(s), claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, succession, bequest, easement, order/ decree/judgment of court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned at the within mentioned address and within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the said Property)**

All that piece and parcel of the agricultural land bearing Gat Kramank / Upavibhag 80/1 admeasuring 3.60.00 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab / Fallow Land admeasuring 0.28.00 Akak H.R. Sq. Mtrs.),
Assessing at Rs. 9.81 Ps. being, lying and situate at Dande Tarfe Nangaon, Taluka Murud and District Raigad.

**Adv. S. Y. Bartake**
**Adv. S. S. Bartake**
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag, Taluka Alibag, District Raigad, 402 201.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नंबर ७४/८ब, ७४/८क, ८१/१, ८१/२, ८०/१, ८२/४ब, ८९/६ वगैरे नवीन सर्व्हे नंबर १३८, बिनशेती प्लॉट नंबर १ ते ९१ एकुण क्षेत्र सुमारे ७१७९० चौरस मीटर ह्या मिळकती, त्या मिळकतीचे मालक हरिश गुणवंतराय गांधी, केवलचंद गणेशमल जैन, महेंद्रकुमार मिश्रीमल जैन व अजयकुमार मधुसुदन साबु यांचे कडून विकत घेणेचे ठरविले आहे. सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर वर्णन केलेल्या बिनशेती प्लॉट मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६/०५/२०२६

**ॲड. सी. बी. ओसवाल**
बी.कॉम. एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

# निवडक

## अनुराज ठाकूरची खो-खो संघात निवड

**खांब :** पनवेल येथे नुकत्याच पार पडलेल्या रायगड जिल्हा कुमार गट खो-खो निवड चाचणी स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत जय बजरंग रोहा खो-खो संघाचा अनुराज योगेश ठाकूर याची सोलापूर येथे होणाऱ्या ५२ व्या महाराष्ट्र राज्य कुमार गट अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेसाठी रायगड जिल्हा कुमार गट संघात निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, अनुराजची सलग दुसऱ्या वर्षी रायगड जिल्हा संघात निवड झाली असून मागील वर्षी देखील त्याने रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले होते. सातत्यपूर्ण सराव, मेहनत, फिटनेस व उत्कृष्ट खेळाच्या जोरावर त्याने पुन्हा एकदा जिल्हा संघात आपले स्थान कायम राखले आहे. जय बजरंग रोहा खो-खो संघाच्या माध्यमातून अनुराजने अनेक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याच्या या निवडीबद्दल जय बजरंग क्रीडा मंडळ रोहा तसेच परिसरातील क्रीडाप्रेमींनी त्याचे अभिनंदन केलेआहे.



## राजस्थानचा प्लेऑफमध्ये रॉयल प्रवेश!

**नवी दिल्ली :** राजस्थान रॉयल्सचा संघ हा आयपीएल २०२६ स्पर्धेतील प्लेऑफमध्ये प्रवेश करणारा चौथा संघ ठरला आहे. स्पर्धेतील ६९ वा सामना मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. राजस्थानला प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी हा सामना जिंकणं अतिशय महत्वाचं होतं. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या राजस्थान रॉयल्सने प्रथम फलंदाजी करताना २०५ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईकडून रोहित शर्माने दमदार अर्धशतकी खेळी केली. पण मुंबईला हा सामना ३० धावांनी गमवावा लागला आहे. या विजयासह राजस्थान रॉयल्सचा संघ हा आयपीएल २०२६ स्पर्धेतील प्लेऑफमध्ये प्रवेश करणारा चौथा संघ ठरला आहे. मुंबई इंडियन्सला हा सामना जिंकण्यासाठी २०६ धावांचा डोंगर सर करायचा होता. या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या मुंबईला चांगल्या सुरुवातीची गरज होती. पण रोहित शर्मा शून्यावर माघारी परतला. तर रायन रिकल्टनने १२ धावा करुन पॅव्हेलियनची वाट धरली. नमन धीर ६ धावांवर बाद झाला. तर तिलक वर्मा अवघ्या ३ धावांवर बाद झाला. त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि विल जॅक्सने मिळून संघाचा डाव सांभाळला. दोघांनी मिळून महत्वपूर्ण भागीदारी केली. विल जॅक्स ३३ धावांवर माघारी परतला. त्यानंतर हार्दिक पंड्याने १५ चेंडूत ३४ धावांची खेळी केली. तर सूर्यकुमार यादवने मुंबईला विजयापर्यंत पोहोचवण्याचा पूर्ण प्रयत्न केला. पण तो ६० धावांवर बाद होऊन माघारी परतला. राजस्थान रॉयल्सचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. पण राजस्थानला हवी तशी सुरुवात करता आली नाही. यशस्वी जैस्वाल २७ धावांवर माघारी परतला. तर वैभव सूर्यवंशी अवघ्या ४ धावांवर माघारी परतला. सलामी जोडी स्वस्तात माघारी परतल्यानंतर ध्रुव जुरेलने ३८ धावांचे योगदान दिले. तर रियान पराग १४ धावांवर माघारी परतला. दासून शनाकाने २९ धावा केल्या. तर डोनोवन फरेराने १८ धावा केल्या. शेवटी जोफ्रा आर्चरने ३२ धावांची बहुमूल्य खेळी केली. तर रवींद्र जडेजाने १९ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या ८ गडी बाद २०५ धावांवर पोहोचवली.

## सुदेष्णा ठरली देशाची वेगवान धावपट्टू

**मेढा :** झारखंड (रांची) येथे सुरू असलेल्या २९ व्या सीनियर राष्ट्रीय चॅम्पियनशिप २०२६ या स्पर्धेमध्ये १०० मीटर धावणे क्रीडा प्रकारात सुदेष्णाने स्वत:ची आतापर्यंतची सर्वोत्कृष्ट ११.५६ सेकंद अशी वेळ नोंदवून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. सुदेष्णा २०१९ पासून आजअखेरपर्यंत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्रासह सातारा जिह्याचे नाव उज्ज्वल करत आहे. सुदेष्णाचा २०१८ पासून खेळाचा प्रवास सुरू झाला आहे. सातारा-जावळी एक्सप्रेस सुदेष्णाने गेली आठ वर्ष तिच्या वयोगटात देशाची वेगवान धावपट्टु होण्याचा बहुमान मिळवला आहे. राष्ट्रीय पातळीवरील ६४ व आंतरराष्ट्रीय पातळीवर ३ पदके मिळवत तिने आपल्या नावाचा दबदबा कायम राखला आहे. खेलो इंडिया स्पर्धेत सलग सहा वर्ष सुवर्णपदक मिळवणारी सुदेष्णा ही देशाची एकमेव खेळाडू आहे.या स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवून सप्टेंबर २०२६ मध्ये जपान येथे होणाऱ्या आशियाई स्पर्धेत आपले स्थान तिने पक्के केलेले आहे. सुदेष्णाचा वेगवान धावपट्टुचा प्रवास जावली तालुक्यातील खर्शी या छोट्याशा खेडेगावातून सुरू झाला. सातारा ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवण्यासह यशस्वी परंपरा राखण्याचे खरे श्रेय तिचे गुरु बळवंत बाबर, पोलीस दलात कार्यरत असलेले वडील हणमंत शिवणकर आणि तिच्या जिद्दीचे आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे पोलीस प्रमुख निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधिक्षक वैशाली कडुकर, गृह उपअधिक्षक अरुण देवकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विश्वजित घोडके आदींनी केले.



## सलग सात विजय, सलग सहा पराभव

# पंजाबचं पॅकअप




**| पंजाब | वृत्तसंस्था |**

दमदार सांघिक प्रदर्शनासह यंदाच्या आयपीएल स्पर्धेत पंजाब किंग्ज संघाने सलग सात लढती जिंकल्या. प्लेऑफ प्रवेशासाठी त्यांना उर्वरित सात लढतीत केवळ दोन विजय मिळवणं आवश्यक होतं. पंजाबसाठी प्लेऑफ प्रवेश औपचारिकता मानला जात होता. ऐन भरात असतानाच पंजाबची गाडी रुळावरून घसरली. एक दोन नव्हे तर सलग सहा लढतीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात खेळणारा पंजाबचा संघ जेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. मात्र सहा पराभवांनी पंजाबची लयच हरपली. मुंबई इंडियन्सने राजस्थानला नमवलं असतं तर पंजाबचा प्लेऑफ प्रवेश पक्का झाला असता पण नियतीच्या मनात वेगळंच काही होतं. रविवारी राजस्थानच्या विजयासह पंजाबचं आव्हान संपुष्टात आलं.

भरधाव निघालेला विजयरथ गाळात रुतावा अशी पंजाबची गत झाली. सलग १९ हंगाम खेळूनही पंजाबचा संघ जेतेपदाविनाच परतणार आहे. कॅचेस विन मॅचेस अशी क्रिकेटमधली जुनी म्हण आहे. पंजाबला या उक्तीचा चांगलाच प्रत्यय घडला. झेल सोडण्याबाबत पंजाब किंग्ज संघाने कहर केला. उडालेल्या ५६ झेलांपैकी १६ झेल त्यांना टिपता आले नाहीत. फलंदाजांचं वर्चस्व राहिलेल्या या स्पर्धेत झेल सुटणं हे जणू पातकच आहे. शशांक सिंह याने सर्वाधिक म्हणजे ५ झेल सोडले. यामुळेच हंगामात पंजाबची कॅचिंग एफिशियन्सी ७१.४३ एवढी राहिली. झेलच्या बरोबरीने पंजाबने स्टंपिंगच्या काही संधीही वाया दवडल्या. हेनरिच क्लासन आणि इशान किशनसारख्या जबरदस्त फॉर्मात असणाऱ्या खेळाडूंचे झेल सोडणं पंजाबला चांगलंच महागात पडलं. पंजाबच्या विदेशी खेळाडूंनाही झेल सोडण्याची लागण झाली.

युझवेंद्र चहल हा पंजाबचा प्रमुख फिरकीपटू आहे. यंदाच्या हंगामात चहलच्या गोलंदाजीवर झेल सुटले हे खरं पण त्याच्या गोलंदाजीतली धार कमी झाल्याचं स्पष्टपणे जाणवलं. १४ लढतीत चहलने १२ विकेट्स पटकावल्या. यंदाच्या हंगामात चहलच्या गोलंदाजीवर सहजपणे धावा लुटल्या गेल्या. पंजाबने फिरकीवर लक्ष दिलं नसल्याचंही आकडेवारी सांगते. डावखुरा फिरकीपटू हरप्रीत ब्रार यंदाच्या हंगामात केवळ दोनच सामने खेळला. दुसऱ्या सामन्यात त्याने विकेट्स पटकावत आपली उपयुक्तता सिद्ध केली. पंजाबच्या फिरकीपटूंनी फक्त ५९ षटकं टाकली. यावरूनच फिरकी हा विषय त्यांनी ऑप्शनला टाकल्यासारखं जाणवलं. पंजाबच्या गोलंदाजांनी ९ वेळा २००पेक्षा जास्त धावा दिल्या. एका हंगामात एवढ्या धावा लूटू देण्याचा हा विक्रम आहे. अर्शदीप सिंग पंजाबच्या माऱ्याचा प्रमुख आहे पण यंदा तो पूर्णपणे भरकटलेला वाटला. टी २० प्रकारात भरवशाचा गोलंदाज असलेल्या अर्शदीपला यंदाच्या हंगामात लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नाही. दक्षिण आफ्रिकेच्या मार्को यान्सनवर पंजाबने विश्वास ठेवला पण ना त्याला धावा रोखता आल्या ना विकेट्स पटकावता आल्या.

प्रियांश आर्यने हंगामाची सुरुवात झंझावाती केली मात्र सात लढतींनंतर प्रतिस्पर्धी गोलंदाजांनी प्रियांशचे कच्चे दुवे हेरले. मार्कस स्टॉइनस अनुभवी अष्टपैलू खेळाडू आहे. मात्र त्याचा अनुभव ना गोलंदाजीत कामी आला ना फलंदाजीत. कॉनलीने चांगली सुरुवात केली मात्र त्यानंतर त्याला मोठी खेळी करण्यात अपयश आलं. नेहलला यंदा सूर गवसला नाही. वैयक्तिक कारणांमुळे अफगाणिस्तानच्या ओमरझाईला मायदेशी परतावं लागलं. याचा मोठा फटका पंजाबला बसला. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण तिन्ही आघाड्यांवर योगदान देणाऱ्या ओमरझाईला राखीव खेळाडूत बसवणं अनाकलनीय होतं.

### स्वप्नांवर पडल पाणी

सलग सात विजयांनंतर पंजाबचा संघ बेसावध झाला. सलग सहा पराभवांचा सामना करावा लागला. उर्वरित ७ पैकी २ सामने जिंकले की प्लेऑफमध्ये इतकं साधं समीकरण त्यांना वाटू लागलं. कोणत्याही धावसंख्येचा पाठलाग करू शकतो किंवा कितीही मोठी धावसंख्या उभारू शकतो हा फाजील आत्मविश्वास पंजाबच्या खेळात दिसू लागला.
दुर्दैवाने पंजाबची कामगिरी घसरत असतानाच बाकी संघांनी चुकांतून शिकत पुनरागमन केलं. पंजाबच्या कच्च्या दुव्यांवर प्रहार करत प्रतिस्पर्धी संघ जिंकू लागले. रोरावत निघालेला पंजाबचा विजयरथ जो गाळात रुतला तो कायमचाच. श्रेयस अय्यर कर्णधार आणि मुख्य फलंदाज म्हणून चांगली कामगिरी करत असतानाही बाकी खेळाडूंची त्याला साथ लाभली नाही. श्रेयसचा मिडास टच पंजाबला प्लेऑफ्समध्ये नेणार असं चाहत्यांना वाटत होतं पण राजस्थानने त्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरलं.

## एसव्ही एल्वरसबर्ग पहिल्यांदाच बुंदेसलीगासाठी पात्र

**| म्युनिक/पॅरिस | वृत्तसंस्था |**



जर्मनीच्या एका अत्यंत लहानशा एल्वरसबर्ग शहराने फुटबॉलच्या जगात एक मोठा चमत्कार करून दाखवला आहे. फक्त १३ हजार लोकसंख्या असलेल्या या भागातील एसवी एल्वरसबर्ग संघाने पहिल्यांदाच जर्मनीच्या सर्वात मोठ्या आणि प्रसिद्ध फुटबॉल लीग बुंदेसलीगासाठी पात्रता मिळवली आहे.

यासोबतच, एल्वरसबर्ग बुंदेसलीगामध्ये पोहोचणारा सर्वात लहान क्लब आणि ही टॉप लीग खेळणारा जर्मनीचा ५९वा संघ बनला आहे.पात्रतेच्या एका महत्त्वाच्या सामन्यात एल्वरसबर्गने प्रूसेन मुंस्टरला ३-० ने पराभूत केले आणि पॉइंट टेबलमध्ये दुसरे स्थान निश्चित केले. सामन्याच्या सुरुवातीच्या १५ मिनिटांतच बंबासे कोंटे आणि डेव्हिड मोकवा यांनी गोल करून संघाला मजबूत स्थितीत आणले होते. दुसऱ्या हाफमध्ये मोकवाने ऐतिहासिक विजय निश्चित केला.

१९०७ मध्ये स्थापन झालेला हा संघ २०२१-२२ पर्यंत जर्मनीच्या चौथ्या लीगमध्ये खेळत होता. गेल्या ५ वर्षांत हे त्यांचे तिसरे प्रमोशन आहे. गेल्या हंगामात ते बुंदेसलीगामध्ये जाण्याच्या अगदी जवळ होते, पण प्लेऑफच्या ९५व्या मिनिटाला हीडेनहाइमकडून गोल स्वीकारल्याने त्यांचे हृदय तुटले होते. त्या धक्क्यानंतर त्यांचे यशस्वी प्रशिक्षक हॉर्स्ट स्टीफन आणि ५ प्रमुख खेळाडू संघ सोडून गेले होते. त्यांनी हॉफेनहाइमकडून कर्जावर आलेल्या बंबासे कोंटे, विंगर लुकास पेटकोव आणि जानेवारीत १६ कोटींना खरेदी केलेल्या स्ट्रायकर डेव्हिड मोकवा यांसारख्या युवा खेळाडूंच्या जोरावर नवा इतिहास घडवला.

### टेनिस स्टार्ससाठी ब्रँड्सची स्पर्धा


## विक्रमी गर्दी असलेल्या खेळाला ग्लॅमरचा तडका

**| न्यूयॉर्क | वृत्तसंस्था |**

जगातील नंबर-१ महिला टेनिसपटू आर्यना सबालेंका इटालियन ओपन स्पर्धेदरम्यान हातात नव्याने लॉंच झालेली गुच्ची पापरात्सो बॅग घेऊन कोर्टवर उतरली, तेव्हा हे स्पष्ट झाले की लक्झरी फॅशन आता टेनिस जगतातही खोलवर रुजले आहे. गुच्चीने जानेवारीमध्ये सबालेंकाला ब्रँड ॲम्बेसेडर बनवले होते. त्यापूर्वी, त्यांनी जुलै २०२२ मध्ये पुरुषांच्या नंबर-१ खेळाडू यानिक सिनरला करारबद्ध केले होते.

त्यानंतर अनेक लक्झरी ब्रँड्स टेनिसपटूंशी जोडले गेले. लुई वीटनने स्पेनच्या टेनिसपटू कार्लोस अल्कराजला करारबद्ध केले. डिओरने चीनच्या झेंग छिनवेनला जोडले. बरबरीने ब्रिटनच्या जॅक ड्रेपरला घेतले. मियू मियूने कोको गॉफ आणि न्यू बॅलन्ससोबत टेनिस कलेक्शन तयार केले आणि नंतर गॉफला करारबद्धही केले. बोटेगा वेनेटाने इटलीच्या लोरेंजो मुसेत्तीला जोडले.

अमेरिकन टेनिस असोसिएशन यूएसटीएच्या आकडेवारीनुसार, अमेरिकेत २०२५ मध्ये टेनिस खेळणाऱ्यांची संख्या १६ लाखांनी वाढली. २०१९ च्या तुलनेत ही ५४% जास्त आहे. टेनिस चॅनलने या वर्षी इंडियन वेल्समध्ये आतापर्यंतची



सर्वाधिक दर्शकसंख्या पाहिली, यात ३९% वाढ झाली. सबस्क्रिप्शन साइन-अप्समध्येही गेल्या वर्षाच्या तुलनेत १५०% वाढ झाली आहे. ग्रँड स्लॅम स्पर्धांमध्ये गर्दी वाढली आहे.

लक्झरी ब्रॅंड्स आता खेळाडूंच्या व्यतिरिक्त टेनिसच्या संपूर्ण वातावरणावर लक्ष केंद्रित करत आहेत. सामन्यांमध्ये खेळाडूंच्या पत्नी, कुटुंब, मैत्रिणी आणि सोशल मीडिया प्रभावशाल्यांची उपस्थिती खूप वाढली आहे. क्रिएटिव्ह स्ट्रॅटेजी एजन्सी एफआरएम नुसार, आता या महिलांची ओळख बदलली आहे. इंटरनेटवर त्यांचे स्वतःचे एक स्वतंत्र स्थान आहे. गुच्चीचे म्हणणे आहे की टेनिस विशेष असले तरी, त्याला जागतिक आकर्षण आहे. विम्बल्डन, मियामी आणि यूएस ओपनसारख्या स्पर्धा वेगवेगळ्या प्रकारच्या प्रेक्षकांना आकर्षित करतात.

## रोनाल्डोने अल नास्त्रला बनवले चॅम्पियन

**| सौदी | वृत्तसंस्था |**

क्रिस्टियानो रोनाल्डोच्या नेतृत्वाखालील अल नास्त्रने हंगामाच्या शेवटच्या दिवशी फुटबॉलमधील सौदी प्रो लीगचे विजेतेपद पटकावले आहे. रियादमधील अल-अव्वल पार्कमध्ये गुरुवारी रात्री खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात अल नासरने उत्कृष्ट खेळ दाखवत दमैक क्लबचा ४-१ असा पराभव केला. पोर्तुगालचा स्टार स्ट्रायकर क्रिस्टियानो रोनाल्डोसाठी सौदी क्लबसोबतचे हे पहिले मोठे अधिकृत विजेतेपद आहे.

गेल्या आठवड्यात एएफसी चॅम्पियन्स लीग टूच्या अंतिम फेरीत जपानी क्लब गांबा ओसाकाकडून पराभव पत्करल्यानंतर रोनाल्डो खूप निराश होता. सामन्याच्या पहिल्या हाफपासूनच अल नास्त्रने आक्रमक फुटबॉल खेळला. संघाला पहिले यश ३३व्या मिनिटाला मिळाले, जेव्हा सादियो मानेने सामन्यातील पहिला गोल केला. जोआओ फेलिक्सच्या कॉर्नर पासवर सादियो मानेने हवेत उडी मारून चेंडू थेट नेटमध्ये ढकलला. फेलिक्स संपूर्ण सामन्यादरम्यान राईट विंग आणि मिडफिल्डमध्ये खूप सक्रिय दिसला, ज्यामुळे दमैकचे डिफेंडर्स सतत दबावाखाली दिसले.

सौदी प्रो लीगमध्ये टिकून राहण्यासाठी संघर्ष करत असलेल्या दमैक संघाने दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला पुनरागमनाचा प्रयत्न केला. सामन्याच्या ५८व्या मिनिटाला दमैकला एक पेनल्टी मिळाली, जी मोर्ले सिलाने कोणतीही चूक न करता गोलमध्ये बदलली आणि स्कोअर १-१ ने बरोबरीत आणला. तर, सामन्याच्या ६२व्या मिनिटाला अल नास्त्रच्या किंग्सले कोमनने उजव्या बाजूने ड्रिबल करत दमैकच्या बचावाला चकवले आणि शानदार मैदानी गोल करून अल नास्त्रला २-१ ने आघाडीवर नेले.

### रोहितच्या नावावर लाजिरवाणा रेकॉर्ड

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

रोहित शर्मा विक्रमांमुळे नेहमी चर्चेत असतो. मात्र यावेळी तो एका नको असलेल्या विक्रमामुळे चर्चेत आला आहे. रविवारी रोहित शर्मा शून्यावर बाद झाला. इंडियन प्रीमियर लीगच्या इतिहासात रोहित शर्मा आता १९ वेळा शून्यावर बाद झाला आहे. यासह त्याने ग्लेन मॅक्सवेलच्या विक्रमाची बरोबरी केली.ग्लेन मॅक्सवेल देखील आपल्या आयपीएल कारकिर्दीत १९ वेळा शून्यावर बाद झाला होता.

## वैभव सूर्यवंशीचा वर्ल्ड रेकॉर्ड

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेत रविवारी राजस्थान आणि मुंबईचा हा अखेरचा साखळी सामना होता. या सामन्यादरम्यान १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने मोठा विश्वविक्रम केला आहे. या सामन्यात राजस्थान रॉयल्स प्रथम फलंदाजीला उतरल्यानंतर यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी डावाची सुरुवात केली. पण चौथ्या षटकात यशस्वी जैस्वालने २७ धावांवर बाद झाला, तर पाचव्या षटकात वैभव सूर्यवंशीला ४ धावांवर दीपक चाहरने बाद केले. पण असे असले तरी वैभवच्या आता आयपीएल



स्पर्धेत १४ षटकात ५८३ धावा केल्या आहेत. त्यामुळे त्याच्या नावावर विश्वविक्रम झाला. वैभव आता एका टी २० स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा किशोरवयीन खेळाडू ठरला आहे. त्याने पडिक्कलचा विक्रम मागे टाकला आहे.

## गुरिंदरवीर भारतातील सर्वात वेगवान धावक

**| रांची | वृत्तसंस्था |**

रांची येथील बिरसा मुंडा स्टेडियम शनिवारी भारतीय ॲथलेटिक्सच्या एका नव्या युगाचा साक्षीदार बनले. येथे पंजाबच्या २५ वर्षीय धावपटू गुरिंदरवीर सिंगने ॲथलेटिक्स फेडरेशन स्पर्धेत पुरुषांची १०० मीटर धावण्याची शर्यत केवळ १०.०९ सेकंदात पूर्ण केली. त्यांनी नवा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला.

हा विक्रम यासाठीही खास आहे, कारण भारतीय ॲथलेटिक्सच्या इतिहासात पहिल्यांदाच १०० मीटर शर्यतीत १०.१० सेकंदांचा टप्पा पार केला गेला आहे, म्हणजेच एखाद्या




ॲथलीटने पहिल्यांदाच १०० मीटरची शर्यत १०.१० सेकंदांपेक्षा कमी वेळेत पूर्ण केली आहे.

गुरिंदरवीरने फिनिश लाईन ओलांडताच छातीवर लावलेला बिब नंबर काढून टाकला आणि उत्साहात ओरडत ट्रॅकवर शूज फेकले. तो म्हणाला, लोक म्हणायचे की भारतीयांकडे १०० मीटरसाठी योग्य जनुके नाहीत. मला सगळ्यांना चुकीचे सिद्ध करायचे होते. भारतीय जनुके खूप मजबूत आहेत आणि ही फक्त सुरुवात आहे.

गुरिंदरवीरची ही वेळ या हंगामात संपूर्ण आशियातील दुसरी सर्वात वेगवान वेळ आहे, जी जपानच्या फुकुतो कोमुरो (१०.०८ सेकंद) पेक्षा फक्त एका क्षणाने कमी आहे. यासोबतच त्याने २०२६ च्या कॉमनवेल्थ गेम्सच्या पात्रता गुणांना (१०.१६ सेकंद) देखील सहज पार केले आहे.त्याने आपला कट्टर प्रतिस्पर्धी अनिमेष कुजूरला धक्का देत मागे टाकले.

## दिल्लीचा शेवट गोड!

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. दोन्ही संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले होते, त्यामुळे या सामन्याच्या निकालाचा गुणतालिकेवर फरक पडणार नव्हता. पण तरीदेखील दोन्ही संघांनी विजय मिळवण्यासाठी पूर्ण जोर लावला. इडन गार्डन्सच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना २०३ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या कोलकाता नाईट रायडर्स संघाला १६३ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह दिल्लीने हा सामना ४० धावांनी खिशात घातला.

### मध्यपूर्वेतील तणावामुळे निर्णय | १५ जून रोजी विश्वचषकात पहिला सामना खेळणार संघ

## इराण फुटबॉल संघाचा बेस कॅम्प मेक्सिकोला हलवला

**| फिनिक्स | वृत्तसंस्था |**

इराणने आपले बेस कॅम्प अमेरिकेतून मेक्सिकोमध्ये हलवले आहे. इराण फुटबॉल महासंघाचे अध्यक्ष मेहदी ताज यांनी शनिवारी ही माहिती दिली. मात्र, फिफाने अद्याप याची पुष्टी केलेली नाही. इराणला ॲरिझोनाच्या टक्सनमध्ये प्रशिक्षण शिबिर आयोजित करायचे होते, परंतु मध्यपूर्वेतील युद्ध आणि सुरक्षा चिंतेमुळे ते इतरत्र हलवण्यावर चर्चा सुरू होती. टक्सन येथील कीनो स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या अधिकाऱ्यांनी यावर कोणतीही टिप्पणी केली नाही.



इराणच्या महासंघाचे म्हणणे आहे की, संघ आता सॅन डिएगोच्या दक्षिणेकडील मेक्सिकोमधील तिजुआना येथे मुक्काम करेल. विश्वचषक ११ जून ते १९ जुलैपर्यंत चालेल. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको याचे यजमानपद भूषवत आहेत. मेहदी ताज म्हणाले, विश्वचषकात सहभागी होणाऱ्या सर्व देशांना त्यांच्या बेस कॅम्पसाठी फिफाची मंजुरी घ्यावी लागते. सुदैवाने, फिफा आणि विश्वचषक अधिकाऱ्यांसोबत इस्तंबूलमध्ये झालेल्या बैठकांनंतर, आमच्या संघाचे बेस कॅम्प अमेरिकेतून मेक्सिकोमध्ये हलवण्याची आमची मागणी स्वीकारण्यात आली आहे.

इराण वर्ल्ड कपमध्ये ग्रुप-जी मधील आपला पहिला सामना १५ जून रोजी कॅलिफोर्नियातील इंग्लेवुड येथे न्यूझीलंडविरुद्ध खेळेल. त्यानंतर ६ दिवसांनी तो याच ठिकाणी बेल्जियमशी भिडेल. संघ ग्रुप स्टेजमधील आपला अंतिम सामना २६ जून रोजी सिएटलमध्ये इजिप्तविरुद्ध खेळेल. इराणच्या संघाने सातव्यांदा फिफा वर्ल्ड कपसाठी पात्रता मिळवली आहे. संघाने आतापर्यंत फक्त ३ सामने जिंकले आहेत.

इराणने यापूर्वी अमेरिकेच्या यजमानपदाखाली कोणताही सामना खेळण्यास नकार दिला होता. तेथील क्रीडा मंत्री अहमद दुन्यामाली यांनी सांगितले होते की, फुटबॉल संघ २०२६ च्या फिफा विश्वचषकात भाग घेऊ शकत नाही. त्यांचे म्हणणे होते की, अमेरिकन-इस्त्रायली हल्ल्यांमध्ये इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या हत्येनंतर अशा परिस्थितीत स्पर्धेत भाग घेणे शक्य नाही. नंतर फिफाने मन वळवल्यावर तो तयार झाला.

## खेळताना हृदयविकाराचा झटका

**| बंगळूर | वृत्तसंस्था |**

कर्नाटकचे माजी वेगवान गोलंदाज एस. एल. अक्षय याचे एका क्लब मॅचदरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. बंगळूर येथे सुरू असलेल्या कर्नाटक राज्य क्रिकेट संघटना तिसऱ्या श्रेणी लीग सामन्यात अक्षय सफायर सीसी संघाकडून खेळत होता. सामन्यादरम्यान त्याने चार षटके गोलंदाजी केली, परंतु त्यानंतर त्याला अचानक अस्वस्थ वाटू लागले.

छातीत जास्त वेदना व्हायला लागल्याने तो मैदानाबाहेर गेला. त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. २०१४-१५ च्या हंगामात रणजी करंडक विजेत्या ठरलेल्या कर्नाटकच्या बलाढ्य संघाचा अक्षय एक महत्त्वाचा भाग होता. देशांतर्गत क्रिकेटमध्ये, त्याने आपल्या वेगवान गोलंदाजीच्या जोरावर स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले होते.

अक्षयची क्रिकेट कारकीर्द फार मोठी नसली, तरी त्याची कामगिरी उल्लेखनीय होती. २०११ ते २०१३ दरम्यान त्याने कर्नाटकचे प्रतिनिधित्व केले.फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये ६ सामन्यांत १८ विकेट्स आणि ८९ धावा. लिस्ट-ए क्रिकेट मध्ये ३ सामन्यांत ६ विकेट्स आणि ११ धावा.टी-२० क्रिकेटमध्ये ९ सामन्यांत ८ विकेट्स आणि १० धावा केल्या आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)